नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २८५ * * अकोला * शुक्रवार, दिनांक ११ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त




## दिल्लीत विमान उतरल्यानंतर पायलटचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १० :
दिल्लीत एअर इंडिया एक्सप्रेसच्या एका पायलटचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. श्रीनगर-दिल्ली विमान उतरल्यानंतर पायलट विमानतळावर इतर औपचारिकता पूर्ण करत असताना इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर ही घटना घडली.

विमान कंपनीच्या म्हणण्यानुसार, लँडिंगनंतर पायलटला त्रास होऊ लागला आणि काही वेळाने तो बेशुद्ध पडला. पायलटला रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्या वैमानिकाचे नाव अरमान आहे. अरमान २८ वर्षांचा होता आणि त्याचे नुकतेच लग्न झाले होते. विमान उतरल्यानंतर कॉकपिटमध्ये पायलटला उलट्या झाल्या आणि डिस्पॅच ऑफिसमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने त्याचा मृत्यू झाला.

अग्राग्रलेख

खरीखरी...

## भारतद्रोही त्रिकूट

भारत सरकारने बांगलादेशला भारताच्या जमिनीवरून दुसऱ्या देशात माल पाठवण्यावर बंदी घातली आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये हा प्रतिबंध सुयोग्यच आहे. मात्र सध्या बांगलादेशच्या जनतेने नियुक्त न केलेला अनर्थकारी सर्वेसर्वा मोहम्मद युनूसने भारताबरोबर उभा पंगा घेण्याचे ठरवलेले दिसते. चीनच्या पोलादी पंजाखाली येऊन भारताची जी पूर्वोत्तर राज्ये आहेत. त्या भागामध्ये आर्थिक विस्तार करण्याचे त्यांनी आवाहन केलेले होते. भारताला या वक्तव्यामुळे निश्चितच राग येणे स्वाभाविक आहे, किंबहुना ते अत्यावश्यकच आहे. आता बांगलादेशाला तंबी दिल्यामुळे युनूस आणि बांगलादेशातील पाकिस्तानचे आणि चीनचे बगलबच्चे भारताबरोबर सरळ वागतील असे अजिबात वाटत नाही. ज्या शेख मुजीबुर रहमान यांनी पाकिस्तानच्या तावडीतून भारताच्या मदतीने बांगलादेशची मुक्तता केली. त्या शेख मुजीबुर रहमान यांचे पुतळे फोडण्यापर्यंत पाकिस्तानचे आयएसआय एजंट याच बांगलादेशीयां मार्फत पोहोचलेले आहेत. पाकिस्तान आणि बांगलादेश आता पुन्हा एकत्र येतील असे अजिबात वाटत नाही. पण आता पाकिस्तान, चीन आणि बांगलादेश एकत्र येऊन हे राजदोही त्रिकूट भारतावर डोळे वटारण्याला कमी करणार नाही. ही सुद्धा एक शक्यता आहे. त्यामुळेच पाकच्या वायुसेनेचे प्रमुख जलील अहमद बाबर अचानक चीनच्या दौऱ्यावर गेलेले आहेत आणि त्यांनी चीनचे संरक्षण मंत्री डोंग ज्यूंग यांच्याबरोबर चर्चा केलेली आहे. पाकिस्तानची सेना आणि चीन हे दोघेही मिळून बांगलादेशच्या बेकायदा सरकारला पाठिंबा देत आहेत. अर्थात हे सूर्यप्रकाशा इतके स्वच्छ आहे. नेहमीच्या सवयीप्रमाणे चीनला तर शक्य त्या ठिकाणी आपले पाय पसरवायचे आहेतच. चीन पाकिस्तानात एअरबेस बनवण्याची तयारी करीत आहे. 1971 साली भारताने पळता भुई थोडी केलेल्या पाकिस्तानने आपल्या आयएसआय च्या नेटवर्कद्वारे रोहिंगी आर्मी तयार करण्याचे ठरवलेले दिसते. त्याबरोबरच पाकिस्तानची सेना उल्फा सारख्या उग्र वाद्यांना बांगलादेशात पुन्हा मदत देत आहे. म्हणजेच कसेही करून भारताच्या पूर्वोत्तर सीमा काबीज करण्याचा या तीन देशांचा म्हणजेच भारत दोन्ही त्रिकुटाचा इरादा दिसतो आहे. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतल्यावर अनेक खटल्यांना सामोरे गेलेले युनूस सुडाने पेटलेले आहेत. एकूणच हे भारतद्रोही त्रिकूट भारतावर तिन्ही बाजूंनी हल्ले करण्याच्या योजनेत गुंतलेले आहे. भारताला आपल्या या तिन्ही शेजाऱ्यांपासून असलेला धोका वाढण्यापूर्वीच काहीतरी उपाययोजना करावी लागेल. हे राज्यकर्त्यांनी लक्षात ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. शेख हसीना सत्तेवर असेपर्यंत बांगलादेशची सीमा भयमुक्त होती. पण आता ती सीमाही उग्र वाद्यांच्या हातात जाईल असे दिसते. भारताची चहूबाजूंनी कोंडी करण्याची योजना बांगलादेशाला हाती धरून चीन आणि पाकिस्तानने ठरवलेली दिसते. मात्र हा डाव उधळून लावला. तरच भारताची मुत्सद्देगिरी दिसून येईल. अर्थात आपल्या सरकारलाही हे ठाऊकच आहेच.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# तहव्वूर राणाला अखेर भारतात आणले!

## मुंबई हल्ल्यातील प्रमुख दोषी, अमेरिकेहून विशेष विमान उतरले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :
मुंबई दहशतवादी हल्ल्यातील दोषी तहव्वूर राणाला आज भारतात आणण्यात आले. वृत्तानुसार, तपास संस्था एनआयए आणि गुप्तचर संस्था रॉ यांचे संयुक्त पथक बुधवारी एका विशेष विमानाने तहव्वूरसोबत रवाना झाले. हे विमान आज दुपारी दिल्ली विमानतळावर उतरले. येथून तेहव्वूरला अटक करून एनआयए मुख्यालयात नेण्यात आल्याचे समजते.

एनआयए आणि रॉ टीमच्या सुरक्षेत राणा आज दुपारी एका खास विमानाने दिल्ली विमानतळावर उतरला. तो भारतात पोहोचताच, एनआयए टीमने त्याला अधिकृतपणे ताब्यात घेतले. तहव्वुर राणाला दिल्लीतील तिहार तुरुंगातील उच्च सुरक्षा वॉर्डमध्ये ठेवण्यात येईल. तुरुंग प्रशासनाने विशेष सुरक्षा व्यवस्था केली आहे.




वृत्तानुसार, राणाच्या प्रत्यार्पणाबाबत दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षालाही हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे.
केंद्र सरकारने या प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून अधिवक्ता नरेंद्र मान यांची नियुक्ती केली आहे. त्यांना ही जबाबदारी तीन वर्षांसाठी किंवा खटल्याची सुनावणी पूर्ण होईपर्यंत देण्यात आली आहे.

तहव्वूरने भारतात येऊ नये म्हणून अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, जी फेटाळण्यात आली. त्यांच्या याचिकेत त्यांनी स्वतःला पार्किन्सन आजाराने ग्रस्त असल्याचे सांगितले होते आणि म्हटले होते की जर त्याला भारतात पाठवले गेले तर त्यांच्यावर अत्याचार होऊ शकतात.

तहव्वूर राणा याला 2009 मध्ये एफबीआयने अटक केली होती. राणा यांना अमेरिकेत लष्कर-ए-तोयबाला पाठिंबा दिल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले होते. आतापर्यंत त्याला लॉस एंजेलिसच्या एका डिटेंशन सेंटरमध्ये ठेवण्यात आले होते.

दरम्यान, राणाला भारतात आणण्यासाठी गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) अजित डोवाल यांनी गृह मंत्रालयात बैठक घेतली. मुंबई हल्ल्यात दहशतवाद्यांनी ताजमहाल हॉटेललाही लक्ष्य केले होते. येथे ३१ लोक मारले गेले. एकूण मृतांची संख्या १७५ होती. मुंबई हल्ल्यातील ४०५ पानांच्या आरोपपत्रात राणाचे नाव आरोपी म्हणून सूचीबद्ध आहे.

## सदानंद दाते करणार राणाची चौकशी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :
मुंबईवरील 26/11 हल्ल्यातील प्रमुख आरोपी तहव्वूर राणाच्या चौकशीची जबाबदारी एका मराठी आयपीएस अधिकाऱ्यावर सोपवण्यात आली आहे. एनआयएच्या कोठडीत त्याची चौकशी करण्याची जबाबदारी एनआयए चिफ तथा वरिष्ठ आयपीएस अधिकारी सदानंद दाते यांच्यावर आहे.

विशेष म्हणजे सदानंद दाते यांनी 26/11 च्या हल्ल्यावेळी स्वतः मुंबईत तैनात होते. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह कामा हॉस्पिटलमध्ये हल्ला करणाऱ्या अतिरेक्यांसोबत दोन हात केले होते.

सदानंद दाते हे 1990 च्या महाराष्ट्र कॅडरचे वरिष्ठ आयपीएस अधिकारी आहेत. भारतातील निवडक कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये त्यांची गणना होते. 26/11 हल्ल्यावेळी दाखवलेल्या अतुलनीय शौयासाठी ते ओळखले जातात. त्यांनी एनआयएस सह इतर केंद्रीय तपास यंत्रणांमध्येही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. पाक स्थित लष्कर ए तोयबाच्या अतिरेक्यांनी 26 नोव्हेंबर 2008 रोजी केलेल्या हल्ल्यावेळी सदानंद दाते मुंबई क्राईम ब्रॅन्चमध्ये कार्यरत होते.

## सिंचन घोटाळ्याची चौकशी कधीच करायची नव्हती

### अमित शहांच्या दौऱ्यावरून दमानियांचा घणाघात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :
केंद्रीय गृहमंत्री शुक्रवारपासून दोन दिवसीय महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. 12 एप्रिल रोजी ते रायगडावर भेट देतील. या दौऱ्यात ते राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांच्या निवासस्थानी भोजनासाठी जाणार आहेत.



यावरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी 72 हजार कोटींच्या घोटाळ्याचा उल्लेख करत जोरदार टीका केली. या घोटाळ्याची चौकशी करायची नव्हती, फक्त धमकावून सत्ता आणायची होती, असे अंजली दमानिया म्हणाल्या.

2004 ते 2008 या काळात महाराष्ट्रात 72 हजार कोटींचा कथित सिंचन घोटाळा झाला होता. मात्र 2012 मध्ये तो उघडकीस आला. या घोटाळ्याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यातर्फे अजित पवार, सुनील तटकरे आणि छगन भुजबळ यांच्याविरोधात चौकशी सुरु करण्यात आली होती. नंतर अजित पवारांना क्लीन चिट देण्यात आली होती. सिंचन घोटाळ्याचे आरोप झालेले सुनील तटकरे यांच्या निवासस्थानी गृहमंत्री अमित शहा जाणार असल्यामुळे अंजली दमानिया यांनी संताप व्यक्त केला आहे.

72 हजार कोटीचा सिंचन घोटाळा आठवतो का? त्याचे पुढे काय झाले? कारण आपले थर्ड क्लास राजकारण. घोटाळ्याची चौकशी कधीच करायची नव्हती. फक्त धमकी देऊन, महाराष्ट्रात सत्ता आणायची होती, असा आरोप अंजली दमानिया यांनी केला. यावरून पुन्हा राजकारण तापणार असल्याचे संकेत आहेत.

## ...हे कुटुंब म्हणजे लुटारूंची टोळी!

### तनिषा भिसे प्रकरणात विजय वडेट्टीवार यांची सडकून टीका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :
तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबीयांवर कडाडून हल्ला चढवला आहे. मंगेशकर कुटुंब माणुसकीला लागलेला कलंक आहे. त्यांनी कधी कुणाला काही दान केले आहे का? खिलारे पाटलांनी त्यांना रुग्णालयासाठी जमीन दान दिली, पण त्यांनी त्यांनाही सोडले नाही, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानाचे तीव्र राजकीय पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.



तनिषा भिसे नामक गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय चांगलेच वादात सापडले आहे. या रुग्णालयावर गंभीर स्थिती रुग्णालयात आलेल्या तनिषा यांच्या कुटुंबीयांकडे प्रसूतीसाठी तब्बल 10 लाख रुपयांची अनामत रक्कम मागितल्याचा आरोप आहे. या प्रकरणी सरकारने नेमलेल्या चौकशी समितीने दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनावर हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवला आहे. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबीयांवर टीकेची झोड उठवली आहे.

विजय वडेट्टीवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, तनिषा भिसे मृत्यू प्रकरण मी रोज वाचतो आहे. मंगेशकर कुटुंब म्हणजे लुटारुंची टोळी आहे. त्यांच्यापैकी कुणी कधी काही दान केले आहे का? चांगले गाणे म्हटले म्हणून सगळ्यांनी मिरवले... लतादीदी, आशादीदी, हे दीदी, ते दीदी... यांनी लोकांसाठी आणि देशासाठी काय केले?

खिलारे पाटलांनी यांना जमीन दान केली, पण मंगेशकरांनी त्यांनाही सोडले नाही. त्यामुळे हे माणुसकीला कलंक आहेत, अशा पद्धतीने रुग्णालय चालवत असतील, तर मंगेशकर कुटुंब कलंक आहेत. या विधानाचे तीव्र पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.

## उपराजधानीत दुहेरी हत्याकांड

■ महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि. १० :
गेल्या काही दिवसांपासून उपराजधानीतील कायदा व सुव्यवस्था बिघडली असून एकाच दिवशी कुख्यात गुन्हेगार भावंडांनी दोघांचा भरचौकात खून केला.

वसंतराव नाईक झोपडपट्टीत घडलेल्या या हत्याकांडामुळे उपराजधानीत एकच खळबळ उडाली आहे. लक्ष्मण राजेश गोडीया (२४) आणि सागर शंकर मसराम (२५) अशी खून झालेल्या युवकांची नावे आहेत. चंद्रशेखर ऊर्फ चंदू इरपाते आणि त्याचा भाऊ पंकज इरपाते अशी आरोपींची नावे आहेत. या दुहेरी हत्याकांडामुळे सीताबर्डीत पुन्हा गँगवॉर सुरु झाल्याचे समोर आले आहे.

माहितीनुसार, अबू बेग हा कुख्यात गुन्हेगार असून तो एका हत्याकांडातून काही दिवसांपूर्वीच जामिनावर कारागृहातून बाहेर आला होता. मात्र, तो न्यायालयात हजर न झाल्याने त्याचा पकड वारंट निघाला होता.

यादरम्यान, तीन दिवसांपूर्वी पंकज इरपाते याच्यासोबत वस्तीतील वर्चस्वावरुन अजीज बेगशी वाद झाला होता. दोघांनी एकमेकांना शिवीगाळ करुन मारहाण केली होती. त्यामुळे चिडलेल्या पंकजने अजीजची तक्रार पोलीस ठाण्यात करण्याची धमकी दिली होती. पोलिसांत प्रकरण गेल्यास सीताबर्डी पोलीस अटक करतील आणि मध्यवर्ती कारागृहात डांबतील, अशी भीती अजीजला होती.

त्याने आपले साथीदार तडीपार आरोपी सागर मसराम आणि लक्ष्मण गोडी यांना पंकजची समजूत घालण्यास पाठविले होते. मात्र, सागर आणि लक्ष्मण हे दोघेही मारण्यासाठी येत असल्याची माहिती पंकज आणि त्याचा भाऊ चंदू यांना मिळाली.

अजीजला नुकताच सीताबर्डी पोलिसांनी अटक केली होती. पंकजने पोलिसांना दिलेल्या टीपवरुनच पोलिसांनी अटक केल्याचा संशय अजीजला होता. त्यामुळे अजीज चिडला होता. लक्ष्मण आणि सागर हे दोघेही अजीज बेग याच्यासाठी काम करायचे. त्याने दोघांनाही पंकजला धडा शिकविण्यासाठी पाठवले होते. मात्र, पंकज आणि चंदू इरपाते यांनी लक्ष्मण आणि सागरचाच काटा काढला. दोघांनाही पोलिसांनी अटक केली.

**सापळा रचून केला खून**
सागर आणि लक्ष्मण हे दोघेही गुन्हेगार होते. ते पंकजच्या वस्तीत आले. त्यामुळे पंकज व त्याचा भाऊ चंदू यांनी एका गल्लीत दोघांनाही अडवले. चंदू दोघांशी बोलत असताना पंकजने मागून दोघांवरही लोखंडी रॉडने हल्ला केला. सागरच्या डोक्यात रॉडचा मार बसल्यामुळे तो जागीच ठार झाला तर गंभीर जखमी लक्ष्मण याचा आज गुरुवारी पहाटे मृत्यू झाला.

## एफबी म्हणजे 'फुकटचा बाबूराव'

### शिंदेंचा ठाकरेंना टोला

■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १० :
एफबी म्हणजे फुकटचा बाबूराव, असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांच्यावर टोला लगावला आहे.



सांगोला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे उद्घाटन झाले, या प्रसंगी भाषण करताना एकनाथ शिंदे यांनी जोरदार टोलेबाजी केली आहे. तसेच मी पण एफबी म्हणजे 'फेव्हरेट भाऊ', असल्याचेही त्यांनी यावेळी म्हटले आहे.

शिंदे म्हणाले, खुर्च्या बदलल्या तरी दिल बदलले नाही. लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. आम्ही जे बोललो ते सर्व देणार आहोत. फक्त थोडी थोडी परिस्थिती सुधारू द्या. कर्जमाफी असो किंवा काहीह घोषणा, त्या टप्प्याटप्प्याने पूर्ण करणार, असे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.

## मुंडे व गँग औरंगजेबाहून क्रूर : करूणा कडाडल्या

■ वृत्तसंस्था, बीड, दि. १० :
धनंजय मुंडे व त्यांची गँग मुघल बादशहा औरंगजेबाहून अधिक क्रूर असल्याचा आरोप करुणा शर्मा मुंडे यांनी केला आहे. औरंगजेबाने स्वतःच्या बायकोला तुरुंगात डांबले नव्हते.

आपल्या बायकोला गुंडांकडून मारहाण केली नव्हती. त्याने जखमांवर मीठ चोळले होते. यांच्यासारखी जखमांवर लघवी केली नव्हती. त्यामुळे हे लोक मंत्री किंवा आमदार होणे सोडा, साधे समाजात राहण्याच्याही लायकीचे नाहीत, असे त्या या प्रकरणी आपला संताप व्यक्त करताना म्हणाल्यात.



करुणा शर्मा यांनी धनंजय मुंडे व त्यांच्या सहकाऱ्यांवर चांगलेच तोंडसुख घेतले आहे.

## पॅकेज्ड फूडवर वॉर्निंग लेबल लावा

### सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १० :
पॅक केलेल्या अन्नावर वॉर्निंग लेबलिंगबाबत तीन महिन्यांत नवीन नियम बनवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत.

एका जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने हा आदेश दिला. यामध्ये प्रत्येक पॅक केलेल्या अन्नपदार्थाच्या पुढच्या बाजूला स्पष्ट इशारा देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली. यामुळे लोकांना त्या वस्तूमध्ये किती साखर, मीठ किंवा हानिकारक चरबी आहे हे कळेल.

केंद्र सरकारने न्यायालयाला सांगितले की या मुद्द्यावर १४ हजारांहून अधिक सूचना आणि अहवाल प्राप्त झाले आहेत. यासाठी, एक तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली आहे जी या सूचनांवर आधारित अहवाल तयार करेल.

न्यायालयाने आदेश दिले की या समितीने शक्य तितक्या लवकर अहवाल तयार करावा जेणेकरून त्या आधारावर लेबलिंग नियमांमध्ये सुधारणा करता येतील.




## नोकरी गमावलेल्या शिक्षकांचे आंदोलन




■ वृत्तसंस्था, कोलकाता, दि. १० :
पश्चिम बंगालमधील शिक्षक भरती घोटाळ्यात नोकरी गमावलेल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नोकरी गमावल्याच्या आणि पोलिस कारवाईच्या निषेधार्थ गुरुवारी उपोषणाची घोषणा केली आहे. रात्रीपासून शिक्षक निदर्शने करत आहेत. एका शिक्षकाने सांगितले की, 'उपोषण आंदोलन सुरू झाले आहे आणि लवकरच पुढील कार्यक्रम तयार केला जाईल.'

यापूर्वी, शिक्षकांनी जिल्हा निरीक्षक (डीआय) कार्यालयाबाहेर निदर्शने केली होती. जिथे निदर्शकांनी पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचा आणि लाथा-बुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप केला. कलकत्ता उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि भाजप उमेदवार अभिजित गंगोपाध्याय म्हणाले, 'इतरांच्या चुकीमुळे नोकरी गमावलेल्या निष्पाप शिक्षकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. भाजप अशा शिक्षकांसोबत आहे.

८ एप्रिल रोजी राहुल गांधी यांनी २५,७५३ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द करण्याबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहिले होते. राहुल यांनी राष्ट्रपतींकडे अशी मागणी केली आहे की जे निर्दोष आहेत त्यांना त्यांच्या नोकऱ्यांवर राहू द्यावे. दुसरीकडे, ८ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली. शालेय कर्मचाऱ्यांसाठी अतिरिक्त पदे निर्माण करण्याच्या पश्चिम बंगाल मंत्रिमंडळाच्या निर्णयाच्या सीबीआय चौकशीला न्यायालयाने स्थगिती दिली होती.



## चार जणांचा बळी घेणारी वाघीण जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १० :
सावली आणि चिचपल्ली रेंजमध्ये चार जणांच्या मृत्यूसाठी आणि मानवी वस्तीजवळ जाण्याच्या अनेक घटनांसाठी जबाबदार असलेल्या नागरिकांसाठी अतिशय घातक असलेल्या वाघिणीला बुधवारी संध्याकाळी रॅपिड रिस्पॉन्स टीमला पकडण्यात यश आले.

चिचपल्ली रेंजमधील उमा नदीजवळील शेतात वाघिणीने दुसऱ्यांदा बळी घेतल्यावर लगेचच ५ एप्रिल रोजी तिला पकडण्याचे आदेश देण्यात आले. सावली रेंजचे आरएफओ विनोद धुर्वे यांनी माहिती दिली की, ही वाघिणी तिच्या तीन बछड्यांसह वारंवार सावली रेंज आणि लगतच्या भागातून फिरत होती आणि गेल्या काही महिन्यांत तिने तीन जणांना मारले आहे.

उमा नदी ओलांडताना आणि चिचपल्ली रेंजमध्ये प्रवेश करतानाही ही वाघीण आढळली, जिथे तिने ५ एप्रिल रोजी चौथा प्राणघातक हल्ला मानवावर केला.

आदेश जारी झाल्यापासून, सावली आणि चिचपल्ली रेंजमधील वन पथके वाघिणीचा सक्रियपणे शोध घेत होती. चंद्रपूर वन विभागातील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. कुंदन पोडचलवार यांच्या नेतृत्वाखालील आरआरटी पथक गेल्या तीन दिवसांपासून बचाव कार्यासाठी तैनात करण्यात आली होती.

बुधवारी संध्याकाळी, उमा नदीजवळील सावली रेंज मध्ये वाघिण अखेर आढळून आली. संध्याकाळी ६.३० वाजता, आरआरटीच्या एका शार्पशूटरने वाघिणीला बेशुद्ध केले. शांत झाल्यानंतर, तिला सुरक्षितपणे पकडून पिंजऱ्यात ठेवण्यात आले, यामुळे घाबरलेल्या ग्रामस्थांना दिलासा मिळाला. दरम्यान, वाघिणीच्या ७-८ महिन्यांच्या वयाच्या तीन बछड्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, जे अजूनही परिसरात आहेत.

वन अधिकाऱ्यांना भीती आहे की ही बछडे त्यांच्या आईशिवाय स्वतःहून जगू शकणार नाहीत आणि म्हणूनच त्यांनी त्यांना वाचवण्याचा निर्णय घेतला आहे. वाघिणीला ज्या भागात पकडण्यात आले त्या परिसरात एकूण ४० कॅमेरा ट्रॅप बसवण्यात आले आहेत आणि बछड्यांना पकडण्यासाठी मांसाने आमिष दाखवलेले तीन पिंजरे ठेवण्यात आले आहेत.

आरएफओ धुर्वे यांनी सांगितले की पकडलेल्या वाघिणीला सावली येथे ठेवण्यात आले आहे आणि तिच्या बछड्यांना पिंजऱ्यात बंदिस्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सुरुवातीला वाघिणींना पिंजऱ्यात ओढण्याची योजना आहे, परंतु जर ते पिंजऱ्यात शिरण्यात अयशस्वी झाले तर पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार वन विभागाला त्यांना बेशुद्ध करून पकडावे लागू शकते, असेही त्यांनी सांगितले.

## धर्मदाय रुग्णालयांनी दर्शनी भागात 'धर्मादाय' असा बोर्ड लावावा



■ **पुणे :** अनेक रुग्णालये धमार्दाय असूनही त्याची माहिती देत नाहीत, त्यामुळे सामान्य नागरिकांना मदत मिळत नाही हे निदर्शनास आले आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकालाही चांगले उपचार मिळावे यासाठी असलेला धमार्दाय रुग्णालयाचा हेतूच साध्य होत नाही. तेव्हा सर्व धमार्दाय रुग्णालयांनी यापुढे 'धमार्दाय' असा उल्लेख असलेला फलक दर्शनी भागात लावावा, असे निर्देश राज्य महिला आयोगाने दिले आहेत.

रुपाली चाकणकर म्हणाल्या की, जे रुग्णालय असे बोर्ड लावणार नाही असे आढळल्यास तसेच नियमावली प्रमाणे मदत न मिळाल्यास नागरिकांनी राज्य महिला आयोगाला अन शासनाला लगेच तक्रार द्यावी. दीनानाथ रुग्णालयाशी संबंधित तनिषा भिसे गरोदर माता मृत्यू प्रकरणानंतर खडबडून जागे झाले आहे. सर्वच खासगी रुग्णालयांना नोटीस बजावून उपचारापूर्वी डिपॉझिट घेण्यास मनाई केली आहे. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णावर प्रथम उपचार करा त्यानंतर त्यांच्याकडे पैसे मागा, असे या नोटीसीत नमूद करण्यात आले आहे.

## एक हजार पानांचे आरोपपत्र दाखल

### सैफ अली हल्ला प्रकरण



**मुंबई :** सैफ अली खानवरील हल्ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी वांद्रे न्यायालयात १००० पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. त्यात आरोपी शरीफुल इस्लामविरुद्ध अनेक पुरावे समाविष्ट करण्यात आले आहेत.

पोलिसांच्या दाव्यानुसार, आरोपपत्रात फॉरेन्सिक लॅबच्या अहवालाचाही उल्लेख करण्यात आला आहे.

अहवालात म्हटले आहे की, घटनास्थळी सैफ अली खानच्या शरीरातून आणि आरोपीकडे सापडलेले चाकूचे तुकडे एकाच चाकूचे तीन तुकडे आहेत. तसेच, आरोपपत्रात आरोपीच्या डाव्या हाताच्या बोटांच्या ठशांच्या अहवालाचा उल्लेख आहे. यापूर्वी २९ मार्च रोजी सैफ अली खानवर हल्ला केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजादने मुंबई सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. आरोपीने असा दावा केला होता की त्याच्याविरुद्ध खोटा खटला दाखल करण्यात आला.

आरोपी शरीफुल इस्लामच्या जामीन अर्जावर शुक्रवारी, ४ एप्रिल रोजी मुंबई न्यायालयात सुनावणी झाली. मुंबई पोलिसांनी फॉरेन्सिक सायन्स लॅब अहवालात मोठा खुलासा केला होता. पोलिसांनी न्यायालयाला सांगितले की, आरोपींकडून जप्त केलेला चाकूचा तुकडा, गुन्ह्याच्या ठिकाणी सापडलेला भाग आणि सैफच्या मणक्यातून काढलेला तुकडा, हे तिन्ही एकाच चाकूचे आहेत. आरोपींविरुद्ध भक्कम पुरावे सापडले आहेत. जर आरोपीला जामीन मिळाला तर तो बांगलादेशला पळून जाऊ शकतो. आरोपींनी दाखल केलेल्या जामीन अर्जात असे म्हटले होते की एफआयआर खोटा आहे आणि तपास पूर्ण झाला आहे, फक्त आरोपपत्र दाखल करणे बाकी आहे.

## पतसंस्थेच्या चेअरमनकडून मोठी फसवणूक

**पुणे :** छत्रपती मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड गेवराईची चेअरमन संतोष बसवंत भंडारी (रा. मिलेनियम पार्क, छत्रपती संभाजीनगर) व इतर यांनी गुंतवणुकदार यांना पतसंस्थेच्या माध्यमातून योग्य लाभ देतो असे सांगून मुदत ठेवी घेऊन गुंतवणुकदाराची १ कोटी १३ लाख ७४ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी डॉ. विजेंद्र उत्तमराव पाटील यांनी आरोपी विरोधात हडपसर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

छत्रपती मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी गेवराईचे चेअरमन संतोष भंडारी व इतर यांनी सदर पतसंस्थेतील ठेवीदार यांना योग्य लाभ देतो असे सांगितले. त्याकरिता तक्रारदार डॉ. विजेंद्र पाटील यांच्याकडून सोसायटी मुदतठेवी जमा करुन त्या मुदत ठेवीची मुदत संपूनही ठेवीदारांच्या ठेवी लाभासह परत देण्यास कसूर करुन ठेवीदारांची रक्कम १ कोटी १३ लाख ७४ हजार ४०० रुपयांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी पुढील तपास हडपसर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक हसन मुलाणी करत आहेत.

## आमिष दाखवून बलात्कार आणि फसवणूक

**पुणे :** मुंबई येथून एक २४ वर्षीय तरुणी पुण्यात कामाकरिता आली असताना कोरेगाव पार्क परिसरातील एका हॉस्टेलवर राहत असताना तिची कबीर अहमद खान ऊर्फ कबीर अरोरा (वय-३०) या तरुणाशी ओळख झाली. सदर तरुणाने तिला लग्नाचे अमिष दाखवत तिला लॉजवर नेऊन तिच्यासोबत शारिरिक संबंध केले. त्यानंतर तिला वेगवेगळी कारणे देत तिच्या नावाने ऑनलाइन कर्ज काढून तसेच तिच्याकडून पैसे घेत तब्बल २५ लाख रुपयांचा गंडा घालण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पिडित तरुणीने आरोपी विरोधात विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

सदर तरुणी ही खाजगी नोकरी करत असून ती एका फाऊंडेशन मध्ये निवड झाल्यानंतर पुण्यात दोन दिवसाचे प्रशिक्षणाकरिता आलेली होती. यादरम्यान ती कोरेगाव पार्क परिसरात एका पुरुष व महिलांचे एकत्रित हॉस्टेल मध्ये राहत असताना तिची कबीर खान या तरुणासोबत ओळख झाली. लग्न करणार असल्याचे आश्वासन देत शारिरिक संबंध केले. नंतर तिच्या नावाने ऑनलाइन कर्ज काढून तो सदर पैसे परत करेल असे सांगून कर्ज घेऊन त्याने तिला आतापर्यंत नेपाळ, थायलंड, अझरबैझान याठिकाणी घेऊन जात तिच्यासोबत वारंवार शारिरिक संबंध केले. तसेच तिच्याकडून यादरम्यान ऑनलाइन पध्दतीने व रोख स्वरुपात २५ लाख रुपये घेऊन त्याने लग्न करण्यास तिच्याशी टाळाटाळ करत तिची फसवणुक केली आहे.

# शरद पवार आजही माझे दैवत



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १०:**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली असली तरी, कोणत्या ना कोणत्या कारणाने दोन्ही गटांचे नेते एकमेकांना भेटतात. दोन्ही गटातील नेत्यांचा एकमेकांशी संवाद होत असतो. दोन्ही गटांकडून शरद पवार आपले आदर्श असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे राष्ट्रवादीतील दोन्ही गट पुन्हा एकत्र येऊ शकतात, अशी चर्चाही अनेकवेळा रंगलेली पाहायला मिळते.

आता राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही शरद पवारांबाबत असेच काहीसे विधान केले आहे. मी शरद पवार यांना काल ही दैवत मानत होतो, आज ही दैवत मानतो, असे अजित पवार म्हणालेत.

विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचा पिंपरी सत्कार कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमावेळी बोलताना अजित पवार यांनी चौफेर फटकेबाजी केल्याचे पाहायला मिळाले. याच कार्यक्रमात बोलताना अजित पवारांनी शरद पवारांबाबत बोलताना मोठे विधान केले. आम्हीसुद्धा आमच्या कुटुंबात कालही शरद पवारांना दैवत मानत होतो आणि आजही मानतो. पण तळ्यात मळ्यात केल्यास निर्णय घेता येत नाहीत, असे अजित पवार म्हणाले.

आज देशाला मोदींसाहेबांसारखा नेता मिळाला आहे. देशाची मान जगात उंचावत आहे. त्यांच्या पाठीशी कुठेतरी राहायला हवं. म्हणून आपण त्या ठिकाणी निर्णय घेतला, असे म्हणत अजित पवार यांनी एकप्रकारे राष्ट्रवादीतून बाहेर पडण्याचे कारणही सांगितले.

दरम्यान, अजित पवार यांनी अण्णा बनसोडे यांचे कौतुकही केले. अण्णा बनसोडे हे गरीब कुटुंबातील कार्यकर्ते आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगून अण्णा बनसोडे यांना विधासभा उपाध्यक्ष केले. पानटपरी ते विधानसभा उपाध्यक्ष असा अण्णा बनसोडे यांचा प्रवास आहे. या प्रवासात बनसोडेंनी बरेच चढ उतार पाहिले. अण्णा बनसोडे यांना अपयश आले, तेव्हा, गौतम चाबुकस्वार आमदार झाले. परंतु त्यांनी हार मानली नाही, ते पुन्हा आमदार झाले, असे अजित पवार म्हणाले.

विधानसभेत काम करत असताना आता भान ठेऊन वागा आणि बोला, असा सल्ला अजित पवारांनी अण्णा बनसोडे यांना दिला. आता तुमच्याकडे सर्वांचे लक्ष लागणार आहे. तुमचे वागणे, बोलणे याकडे सगळेच लक्ष ठेवणार. तुमच्या चिरंजीवांनाही काही गोष्टी सांगा. आपण मोठ्या पदावर गेल्यानंतर आपल्या घरातीलच नातेवाईक काहीतरी वागला तर आपलीच बदनामी होते. त्यामुळे भान ठेऊन काम करा, असे अजित पवार अण्णा बनसोडे यांना म्हणाले.

## मंत्री गणेश नाईक घेणार शिंदेंच्या ठाण्यात जनता दरबार



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १०:**

आगामी महापालिका निवडणुकांवर लक्ष केंद्रित करून भाजप आणि शिंदे गटात पुन्हा एकदा राजकीय वर्चस्वाची स्पर्धा सुरू झाली आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यावर राजकीय दबाव निर्माण करण्यासाठी मंत्री गणेश नाईक ११ एप्रिल रोजी ठाणे जिल्ह्यात जनता दरबार घेणार आहेत.

त्याला प्रत्युत्तर म्हणून खासदार श्रीकांत शिंदे हे मुंबईत शिवसंवाद बैठक घेणार आहेत. दरम्यान, भाजपचा बालेकिल्ला असलेल्या पालघर जिल्ह्यात बुधवारी मंत्री प्रताप सरनाईक यांनी जनता दरबार घेतला.

लोकसभा निवडणुकीदरम्यान भाजपने ठाणे आणि कल्याण लोकसभा मतदारसंघांवर दावा केला होता. परंतु शिंदे यांनी वेगवेगळी कारणे देत दोन्ही लोकसभा मतदारसंघ सोडण्यास स्पष्टपणे नकार दिला होता. मात्र, आता उपमुख्यमंत्री शिंदे यांचा बालेकिल्ला म्हटल्या जाणाऱ्या ठाण्यात आपला महापौर करण्याच्या रणनीतीवर भाजपने कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात अंतर्गत तणावाचे वातावरण आहे. म्हणूनच उपमुख्यमंत्री शिंदे यांनी फडणवीस यांच्यासोबत दोन कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे टाळल्याचे सांगण्यात येत आहे.


मंत्री गणेश नाईक यांना पुढे करून भाजपने ठाण्यात उपमुख्यमंत्री शिंदे यांना राजकीयदृष्ट्या कोंडीत पकडण्याची तयारी केली आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून खासदार श्रीकांत शिंदे सक्रिय झाले आहेत.

मुंबईत शिंदे गटाची ताकद वाढवण्यासाठी त्यांनी शिवसंवाद बैठक घेण्याचा निर्णय घेतला आहे. याची सुरुवात ते लवकरच करू शकतात.

ते दक्षिण मध्य आणि उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघात शिवसंवाद सभा घेणार आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीत शिंदे गटाला आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त नगरसेवक आणायचे आहेत, जेणेकरून शिंदे गटाच्या पाठिंब्याशिवाय भाजपला महापौर करता येणार नाही, असे जाणकार सूत्रांचे म्हणणे आहे.

# सेन्सॉर बोर्डाने सुचवले 'फुले' चित्रपटात १२ बदल

### जयंत पाटलांची नाराजी



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १०:**

समाजसेवक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवनावर आधारीत फुले हा सिनेमा आता वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. ब्राह्मण महासंघाने या चित्रपटावर आक्षेप घेतला होता. त्यानंतर सेन्सॉर बोर्डानेही चित्रपटातील काही दृष्यांवर आक्षेप घेत, ती दृष्ये हटवण्यास आणि काही दृष्यांमध्ये बदल करण्यास सांगितले आहे.


यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष यांनी सेन्सॉर बोर्डावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नामदेव ढसाळ कोण आहेत? असा प्रश्न उपस्थित करणाऱ्या सेन्सॉर बोर्डात किती विद्वान लोक बसतात याची कल्पना आली होती, असा टोला लगावत आता फुले चित्रपटावर आक्षेप घेण्यावरून सेन्सॉर बोर्डाची मानसिकता लक्षात येते, असा टोला जयंत पाटील यांनी लगावला आहे.

'फुले' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाल्यापासून त्यावर गदारोळ सुरू आहे. चित्रपटाबाबत विविध प्रकारचे आरोप केले जात आहेत. आता सेन्सॉर बोर्डानेही चित्रपटाला कात्री लावली आहे. सीबीएफसीने चित्रपटात अनेक बदल करण्याचे निर्देश दिले आहेत. 'फुले' चित्रपटाचे सेन्सॉर प्रमाणपत्र सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. सेन्सॉरने चित्रपटाला सांगितलेल्या बदलांवर जयंत पाटील यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत नाराजी व्यक्त केली आहे.

काश्मीर फाईल्स, केरला फाईल्स सारख्या प्रचारकी चित्रपटांवर सेन्सॉर बोर्ड कोणताही आक्षेप घेत नाही. मात्र "फुले" सारख्या चित्रपटावर आक्षेप घेतला जात आहे. नामदेव ढसाळ कोण? असा प्रश्न उपस्थित करणाऱ्या सेन्सॉर बोर्डात किती विद्वान लोक बसतात याची कल्पना आली होती. पण आता "फुले" चित्रपटावर आक्षेप घेतला जात आहे. त्यातून सेन्सॉर बोर्डाची मानसिकता लक्षात येते, असे जयंत पाटील यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे.

सेन्सॉर बोर्डाने 'फुले' चित्रपटाच्या निर्मात्यांना एकूण १२ बदल सुचवले आहेत. त्यात अनेक संवाद वगळण्याची, काही संवाद लहान करण्याची आणि ऐतिहासिक संदर्भ आणि उपशीर्षकांमध्ये बदल करण्याची विनंती केली आहे.

## इतिहास हा इतिहास म्हणून मांडला गेला पाहिजे...



■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. १०:**

महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित 'फुले' हा चित्रपट वादात सापडला आहे. यावर आमदार छगन भुजबळ यांनीही भाष्य केले.

इतिहास हा इतिहास म्हणून मांडला गेला पाहिजे, असे भुजबळ म्हणाले. महिलांना शिक्षण देण्यासाठी काय त्रास झाला, हे चित्रपटात दाखवण्याचा प्रयत्न आहे. आम्ही सगळे नियमाप्रमाणे केल्याचे चित्रपटाचे दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी मला सांगितले, असेही भुजबळ म्हणाले.

भुजबळ म्हणाले, सिनेमाच्या टीमने मला स्पष्ट सांगितले की, अशा प्रकारचे सिनेमांमध्ये थोडे स्वतंत्र घेऊन नाही ते पण दाखवले आहे. फुलेंचा अभ्यास करूनच आम्ही सगळे काही केले आहे. तो सिनेमाचा एक भाग आहे. कोणाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत असे सांगितले. कर्मठ ब्राह्मण असेल त्यांनी फुले यांना त्यावेळेस विरोध केला, काही ब्राह्मण महात्मा फुले यांच्यासोबत देखील लढत होते. त्यांना मदत करत होते. शाळा बंद करत होते, त्यावेळी लहुजी वस्ताद साळवी यांनी देखील मदत केली. दोन्ही बाजू आहेत. इतिहास हा इतिहास म्हणून मांडला गेला पाहिजे. या चित्रपटाला कुणीही विरोध करू नये, सगळ्यांनी त्यासाठी शुभेच्छा दिल्या पाहिजेत, असेही भुजबळ म्हणाले.

## थकीत परताव्यामुळे १,२०० कोटी बाकी

### एसटी महामंडळ आर्थिक संकटात

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. १०:**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) आर्थिक संकटात सापडले असून, शासनाकडून मागणीच्या तुलनेत निम्माच निधी मिळाल्याने परिस्थिती गंभीर झाली आहे.

महामंडळाने ९९५ कोटींची मागणी केली होती, पण फक्त २७२ कोटी रुपये मंजूर झाले. याशिवाय, राज्य सरकारच्या विविध विभागांकडून सुमारे १,२०० कोटी रुपये थकीत आहेत. यात महिलांना ५०% सवलत, ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास आणि दिव्यांगांसाठीच्या सवलतींचा परतावा समाविष्ट आहे.

सूत्रांनुसार, २०२४-२५ मध्ये या योजनांसाठी ८०० कोटी रुपये देणे बाकी आहे, तर उर्वरित ४०० कोटी रुपये गतवर्षांपासून प्रलंबित आहेत. महिला सवलतीसाठी सामाजिक न्याय विभागाकडून ४५० कोटी, ज्येष्ठ नागरिकांच्या मोफत प्रवासासाठी वृद्ध कल्याण विभागाकडून २५० कोटी आणि दिव्यांग सवलतींसाठी अपंग कल्याण विभागाकडून १०० कोटी रुपये थकीत आहेत. याशिवाय, शालेय विद्यार्थ्यांच्या सवलतींसाठी शिक्षण विभागाकडून २०० कोटी रुपये येणे बाकी आहेत.

या थकबाकीमुळे कर्मचाऱ्यांचे वेतन (५६% मिळाले, ४४% बाकी), भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्युइटी रखडली आहे. कर्मचारी संघटनांनी संताप व्यक्त करत, "अर्ध्या वेतनावर कसे जगायचे?" असा सवाल उपस्थित केला.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अर्थ खात्याच्या विलंबावर नाराजी व्यक्त केली. "वेळेवर निधी मिळाला तरच महामंडळ तोट्यातून बाहेर येईल. ही खेदाची बाब आहे," असे ते म्हणाले.

# भिसे कुटुंबाने नाकारली एकनाथ शिंदेंची ५ लाखांची मदत

### दोषींवर कारवाईची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १०:**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ईश्वरी भिसे यांच्या कुटुंबाला दिलेली ५ लाख रुपयांची आर्थिक मदत भिसे कुटुंबाने नाकारली आहे. ईश्वरी भिसे यांचे पती सुशांत भिसे यांनी ही रक्कम स्वीकारण्यास स्पष्ट नकार देत, "आम्हाला आर्थिक मदत नको, दोषींवर कठोर कारवाई हवी," अशी मागणी लावून धरली आहे.

यापूर्वी भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी देऊ केलेली १ लाख रुपयांची मदतही या कुटुंबाने नाकारली होती. ईश्वरी भिसे यांच्या मृत्यू प्रकरणात कुटुंबाने सुरुवातीपासूनच आर्थिक मदतीपेक्षा न्यायाला प्राधान्य दिले आहे.

ईश्वरी भिसे यांच्या मृत्यूमुळे पुणे आणि राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. या घटनेनंतर सुशांत भिसे यांनी सातत्याने दोषींवर कारवाईची मागणी केली आहे. ते म्हणाले, "पैशांनी आमचे नुकसान भरून निघणार नाही. आमच्या कुटुंबावर झालेल्या अन्यायाला कायदेशीर उत्तर हवे आहे. दोषींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे." त्यांनी सरकार आणि प्रशासनाला या प्रकरणात त्वरित पावले उचलण्याचे आवाहन केले आहे.

एकनाथ शिंदे यांनी भिसे कुटुंबाला ५ लाखांची मदत जाहीर करत, दोषींवर कारवाईचे आश्वासन दिले होते. तत्पूर्वी चंद्रकांत पाटील यांनी १ लाखांची मदत देऊ केली होती, परंतु तीही कुटुंबाने स्वीकारली नव्हती. सुशांत भिसे यांनी तेव्हाही, "न्याय मिळेपर्यंत कोणतीही मदत नको," अशी ठाम भूमिका घेतली होती. या निर्णयाने कुटुंबाच्या न्याय मागणीला सामाजिक पाठिंबा मिळत असून, सरकारवर दबाव वाढला आहे.

या प्रकरणाने आरोग्य व्यवस्था आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भिसे कुटुंबाच्या या नकारामुळे सरकारसमोर आता दोषींना तातडीने पकडून कायदेशीर कारवाई करण्याचे आव्हान आहे. पोलिसांनी तपास सुरू असल्याचे सांगितले असून, लवकरच दोषींना अटक होईल, असे आश्वासन दिले आहे. मात्र, कुटुंब आणि समर्थकांनी जोपर्यंत ठोस कारवाई होत नाही, तोपर्यंत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी प्रताप सरनाईक यांची नियुक्ती



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १०:**

महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रस्ताव मंजूर केला असून, आज याबाबतची घोषणा झाली.

यापूर्वी फेब्रुवारी २०२५ मध्ये आयएएस अधिकारी संजय सेठी यांची या पदावर नियुक्ती झाली होती. मात्र, आता हा निर्णय फिरवून सरनाईक यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. या बदलामागे राजकीय समन्वय आणि शिवसेनेची मागणी महत्त्वाची ठरली आहे.

एसटी महामंडळाची स्थापना १९६० मध्ये झाल्यापासून या पदावर सहसा परिवहन मंत्री किंवा राजकीय व्यक्तीच नियुक्त होत होती. यापूर्वी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना आमदार भरत गोगावाले हे अध्यक्ष होते.

मात्र, डिसेंबर २०२४ मध्ये महायुती सरकार स्थापन झाल्यावर फडणवीस यांनी सेठी यांना नियुक्त केले. ही पहिलीच वेळ होती जेव्हा एका नोकरशहाला हे पद देण्यात आले. या निर्णयाने शिंदे गटात नाराजी पसरली होती, कारण हे पद राजकीय व्यक्तीकडेच राहावे, अशी त्यांची मागणी होती. सरनाईक यांनीही सेठी यांची नियुक्ती "तात्पुरती" असल्याचे म्हटले होते.

मार्च २०२५ मध्ये फडणवीस यांनी हा निर्णय मागे घेत सरनाईक यांना अध्यक्षपद दिले. सूत्रांनुसार, महायुतीतील समन्वय वाढवणे हा यामागचा हेतू आहे. सरनाईक म्हणाले, "एसटीला तोट्यातून बाहेर काढण्यासाठी मी प्रयत्न करेन." मात्र, विरोधकांनी हा निर्णय "राजकीय डावपेच" असल्याची टीका केली आहे.

### अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी मिलिंद जोशी



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १०:**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष पदी प्रा. मिलिंद जोशी यांची निवड करण्यात आली आहे. प्रा. मिलिंद जोशी हे प्रसिद्ध लेखक आणि वक्ते आहेत. तर सुनीताराजे पवार महामंडळाच्या प्रमुख कार्यवाह पदाची जबाबदारी सांभाळतील.

महामंडळाच्या कोशाध्यक्षपदाची जबाबदारी विनोद कुलकर्णी यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. विशेष म्हणजे या नव्या पदाधिकाऱ्यांना 99 वे, 100 वे आणि 101 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाचा मान मिळणार आहे.

## बांधकाम व्यावसायिकावर चेंबूरमध्ये गोळीबार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १०:**

चेंबूरमधील आचार्य अत्रे उद्यानाजवळील सिग्नलजवळ एका बांधकाम व्यावसायिकावर गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. रात्री दोन अज्ञात बाईकस्वारांनी सद्रुद्दीन खान (वय 50) या बांधकाम व्यावसायिकावर गोळीबार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान सद्रुद्दीन खान यांना एक गोळी त्यांच्या गालाला चाटून गेली, तर दुसरी गोळी त्यांच्या गाडीला लागून काचा फुटल्याची माहिती आहे. गोळीबाराच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी दाखल होते पंचनामा केला आहे.

सद्रुद्दीन खान यांना उपचारासाठी झेन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. हा गोळीबार का आणि कुणी केला हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पोलिसांनी या प्रकरणी तपास सुरू केला आहे. सायन-पनवेल हायवेवरून पनवेलच्या दिशेने जात असताना अचानक दोन बाईकस्वार आले आणि त्यांनी बांधकाम व्यावसायिकाच्या डिफेंडर गाडीवर गोळीबार केला.संबंधित बांधकाम व्यावसायिक हा खासदार वर्षा गायकवाड यांचा निकटवर्तीय असल्याची माहिती सूंत्रानी दिली आहे. खासदार वर्षा गायकवाड यांनी सद्रुद्दीन खान यांची भेट घेत प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती दिली आहे.

आरोपींच्या शोधासाठी पाच पथके स्थापन करण्यात केली आहेत असे पोलीसांनी सांगितले आहे. गोळीबारानंतर एका लेनची वाहतूक बंद करण्यात आली आहे. हा परिसर अत्यंत दाटीवाटीचा असल्यामुळे येथे एरव्ही देखील प्रचंड ट्रॅफीक असते. या घटनेने येथे घबराट पसरून आणखीन गोंधळ उडाला. संपूर्ण सायन ते पनवेल महार्गावरील ट्रॅफीक त्यामुळे जाम झाले आहे. फोरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले.

# मी निर्दोष, मला सोडा... वाल्मीक कराडची केविलवाणी मागणी



■ **वृत्तसंस्था, बीड, दि. १०:**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आज बीडच्या जिल्हा व सत्र न्यायालयात तिसरी सुनावणी झाली. विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम हजर राहून न्यायालयाकडे विनंती अर्ज दाखल केला. त्यासाठी निकम हे कालच बीडमध्ये दाखल झाले होते. या सुनावणीनंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी देखील संवाद साधला.

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आज झालेल्या सुनावणीत मुख्य आरोपी वाल्मीक कराड याने न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. यामध्ये मी निर्दोष असून मला सोडा अशी केविलवाणी मागणी त्याने न्यायालयात केली आहे. याबरोबरच आरोपींनी काही कागदपत्र देखील न्यायालयाला मागितली होती. त्यानुसार आज सरकारी पक्षाच्या वतीने ती कागदपत्र न्यायालयात दाखल करण्यात आली असल्याची माहिती विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचा व्हिडिओ आरोपींनी काढला होता. तो व्हिडिओ देखील न्यायालयात दाखल करण्यात आला असून तो आरोपींना देण्याआधी सुनावणी करण्याची विनंती आपण न्यायालयाला केली असल्याची माहिती ॲड. निकम यांनी दिली.

उज्वल निकम यांनी सांगितलेल्या घडामोडींनुसार, वाल्मीक कराडने न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. यामध्ये मी निर्दोष असून, या खुनाशी आणि खंडणीशी माझा काहीही संबंध नसल्याचा दावा त्याने केला आहे. त्यामुळे मला निर्दोष सोडा, अशी मागणी देखील त्याने न्यायालयाला केली आहे.

या प्रकरणातील आरोपींनी न्यायालयाकडे काही कागदपत्रे मागितली होती. ती कागदपत्रे सरकारी पक्षाने न्यायालयात दाखल केली आहेत. संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचा व्हिडिओ आरोपींनी काढला होता. तो व्हिडिओ निकम यांनी न्यायालयात सादर केला आहे. तसेच त्या व्हिडिओची मागणी आरोपीने देखील केली आहे. मात्र, सुनावणी पूर्ण होईपर्यंत तो व्हिडिओ देण्यात येऊ नये, अशी मागणी त्यांनी न्यायालयाकडे केली आहे.

या प्रकरणातील काही पुरावे सीआयडीच्या वतीने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले होते. त्यांचे अहवाल आता प्राप्त झाले आहेत. मात्र, ते सील बंद आहेत. त्याची कॉपी आरोपींनी मागितली असल्यामुळे ते सीलबंद पाकीट न्यायालयाने आरोपींसमक्ष फोडावे आणि त्याची कॉपी द्यावी, अशी मागणी निकम यांनी न्यायालयाकडे केली आहे.

सरपंच देशमुख हत्या प्रकरणात 26 मार्चला झालेल्या दुसऱ्या सुनावणीत बीड जिल्हा सत्र? न्यायालयात ॲड. निकम यांनी न्यायालयाने आरोपीवर चार्ज फ्रेम करावा याबाबत तिस?्या सुनावणीत विनंती अर्ज देणार असल्याचे सांगितले होते. आरोपींपैकी वाल्मीक कराड, महेश केदार, सुदर्शन घुले, प्रतीक घुले, जयराम चाटे, सुधीर सांगळे हे 6 आरोपी बीड जिल्हा कारागृहातील न्यायलयीन कोठडीत आहेत, तर कृष्णा आंधळे हा फरार आहे. आरोपी विष्णू चाटे हा सध्या लातूरच्या कारागृहात आहे.

**व्हिडिओ आणि फोटो समोर**

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील 15 व्हिडिओ आणि 8 फोटोबद्दल माहिती समोर आली आहे. आरोपी महेश केदारने स्वतःच्या मोबाईलमध्ये सरपंच देशमुख यांना मारहाण करताना 8 फोटो आणि 15 व्हिडिओ रेकॉर्ड केले. यात सुदर्शन घुलेने छातीवर उडी मारल्यानंतर देशमुखांनी रक्ताची उलटी केल्याचे समोर आले आहे.

घटनेच्या दिवशी 9 डिसेंबरला 3 वाजून 46 मिनिटांनी आरोपींनी मारहाण करायला सुरुवात केली होती, तर शेवटचा व्हिडिओ हा 5 वाजून 53 मिनिटांचा आहे. त्यानंतर काही वेळाने देशमुख यांचा मृत्यू झाला, अशी माहिती कोर्टासमोर आली आहे.

# शाश्वतं उत्पन्न देणारा फायदेशीर शेती व्यवसाय काळाची गरज : कुलगुरू

■अकोला,दि १० (प्रतिनिधी)

आधुनिकेकडे अग्रेसीत युवा पिढीला संघर्ष, त्याग, समाजहीत, राष्ट्रप्रेम आणि कर्तव्याची जाणीव जागृती होणे काळाची गरज असून याकरिता आपल्या विदर्भाचे थोर सुपुत्र डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवनपटाचे वाचन -चिंतन -मनन आणि अवलंबन होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले. कृषी क्रांतीचे प्रणेते स्व.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या ६० व्या स्मृतिदिनानिमित्त कृषी महाविद्यालयाच्या समिती सभागृहात आयोजित विशेष कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. ग्रामीण भागाच्या शैक्षणिक व कृषि विषयक विकासासाठी कृषी तथा शैक्षणिक क्रांतीचे प्रणेते भाऊसाहेबांचा अद्वितीय कार्य परिचय आम्हा सर्वांसाठीच प्रेरक असून आत्याधुनिक शेती शास्त्राचा देशांतर्गत शेतकरी बांधवांना खऱ्या अर्थाने फायदा होण्यासाठी भाऊसाहेबांनी संसदेत व इतर माध्यमातून ठोस भूमिका मांडत आजच्या कृषिप्रधान विकासाची संकल्पना वास्तवात उतरवली ही आम्हा सर्वांसाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगताना डॉ. गडाख यांनी शाश्वतं उत्पन्न देणारा फायदेशीर शेती व्यवसायच




काळाची गरज असल्याचे प्रेरक प्रतिपादन केले. तर भाऊसाहेब पंजाबराव देशमुख साहेबांचे शैक्षणिक, शेतीविषयक, सामाजिक व राजकीय योगदानाचे मोल लक्षात घेता ते केवळ विदर्भ महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला भूषण असल्याचे मौलिक प्रतिपादन सुप्रसिद्ध लेखक, वक्ता, इतिहास संशोधक, संत साहित्य व तरुणांच्या प्रश्नांचे अभ्यासक म्हणून सुपरीचीत श्री शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय अमरावतीचे प्रा.डॉ. राजेश मिरगे यांनी केले. आपल्या अतिशय अभ्यासपूर्ण, मुद्देसूद,मात्र तितक्याच परखड आणि वास्तविकतेवर आधारित मार्गदर्शनात डॉ. मिरगे यांनी भाऊसाहेबांच्या एकंदरीत जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या जीवनकार्याचे अनेकानेक अप्रकाशित पैलू अवगत करीत उपस्थित प्राध्यापक तथा विद्यार्थी वर्गाच्या मनावर ताबा घेतला.भाऊसाहेबांच्या जीवन कार्यावर प्रमुख अतिथी म्हणून प्रकाश टाकताना प्रा.डॉ. राजेश मिरगे यांनी भाऊसाहेबांचे जीवनातील अधिक प्रसारित न झालेले विविध प्रसंग साकारत उपस्थितांच्या मनाचा ठाव घेत आपले अभ्यासपूर्ण विवेचन अधिकच प्रभाविपणे साकारले.शाश्वत ग्राम विकासासाठी भाऊसाहेबांचे कार्य मौलिक असून आम्ही सर्वांनीच भाऊसाहेबांनी उभारलेले कृषी व शिक्षणाचे हे वैभव अधिक वृद्धिंगत करीत प्रत्येक गाव खेड्यांमध्ये आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रचार प्रसार करीत सर्वार्थाने संपन्न ग्रामीण भागाचे निर्मितीत आपले दिलेले योगदानच भाऊसाहेबांना खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेलं असे सांगताना आदर्श समाज निर्मितीसाठी भाऊसाहेब देशमुखांचे जीवनकार्य आम्हा सर्वांसाठी दिपस्तंभच असल्याचे सांगितले.

## जिल्हा परिषदेच्या सीईओ अनिता मेश्राम रुजू



■अकोला,दि १० (प्रतिनिधी)

अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम रूजू झाल्या. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव यांच्या कडून त्यांनी पदभार स्वीकारला. उपस्थित अधिका-यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. रूजू झाल्या नंतर विविध विभागाची त्यांनी माहिती घेतली.अकोला जिल्हा परिषदेच्या सीईओ म्हणून रुजू होण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य मत्स्यव्यवसाय विकास महामंडळ, मुंबईच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून त्या कार्यरत होत्या. २०१५ च्या बॅचच्या त्या आयएएस अधिकारी आहेत.

## चोरट्यांचा सतत दोन दिवस धुडगूस

अकोला : ८ एप्रिल रोजी सकाळी ०७ ते ०८ वाजे दरम्यान गोरक्षण रोड परिसरातील रचना नगर व मलकापूर परिसरात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून नेल्याची घटना घडली. संशयित २० ते २५ वयोगटातील युवक असून ट्युशन कासचा पत्ता विचारतात आणि गळ्यातील चेन हिसकावून मोटारसायकल वरून पळ काढतात. यामुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. खदान पोलिस चोरांच्या मागावर आहेत.

# अकोल्यात हिट अँड रन! कारचालकानं दुचाकीला दीड किमीपर्यंत फरफटत नेलं



■अकोला,दि १० (प्रतिनिधी)

अकोल्यात 'हिट अँड रन'चा थरार पाहायला मिळालाय. अकोल्यातील 'हिट अँड रन'च्या अपघाताची सीसीटीव्ही फुटेज देखील समोर आल्यात. कार चालकाने एका दुचाकीला तब्बल दीड किमीपर्यंत फरफटत नेले.अकोल्यातल्या मोठी उमरी भागातील जिल्हा परिषद शाळेसमोर हा संपूर्ण हिट अँड रन'चा थरार घडला आहे. या कार चालकाने तब्बल एक किमी पर्यंत या दुचाकीला फरफटत नेले.. इतकेच नव्हे तर पुढे चार ते पाच दुचाकी वाहनांना उडवल आहे. या अपघात दोन पेक्षा जास्त जण जखमी झाले.

संतप्त नागरिकांनी या कारचा चालकाला बेदम चोप दिलाय. दीड किमी अंतरावर नागरिकांनी वाहनाचा पाठलाग केला त्यानंतर अखेर कारचालक हा नागरिकांच्या तावडीत सापडला आणि नागरिकांनी थेट गाडीची तोडफोड केली. या तोडफोडीत वाहनाच्या काचा फोडण्यात आले, त्यासोबतच कार चालकाला बेदम चोप दिलाय. दरम्यान, ही कार एका पोलीस कर्मचाऱ्याची असल्याचे समजते. सदर कार सोळुंके नामक व्यक्तीची कार असल्याचं बोलल्या जाते पोलिसांनी या कारचा कार चालकाला ताब्यात देखील घेतलेय.

**नक्की घडले काय?**

अकोल्यातील मोठी उमरी भागात जिल्हा परिषद शाळेसमोर सोमवारी सकाळी एका चारचाकी वाहनाने पाच ते सहा दुचाकींना जोरात धडक दिली आणि यामध्ये दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.विशेष बाब म्हणजे, या कार चालकाने एका दुचाकीस्वाराला तब्बल दीड किलामीटरपर्यंत फरफटत नेले. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्या पद्धतीने अपघात घडला आणि कार न थांबवता पुढे नेण्यात आली, त्यामुळे उपस्थितांनी प्रचंड संताप व्यक्त केला.अपघातानंतर संतप्त जमावाने कारचा पाठलाग करत दीड किमी अंतरावर कार थांबवली. त्यानंतर जमावाने कार चालकाला पकडून त्याला चोप दिला. इतकंच नव्हे तर जमावाने गाडीची जोरदार तोडफोड केली. गाडीच्या काचा फोडण्यात आल्या आणि वाहनाचे मोठं नुकसान करण्यात आलं.

घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून, त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. प्राथमिक माहितीनुसार, ही कार एका पोलीस कर्मचाऱ्याच्या नावे असून, 'सोळुंके' नामक व्यक्ती याचा वापर करत असल्याचं समजतं. पोलिसांनी तात्काळ कारचालकाला ताब्यात घेतलं असून, अपघाताबाबत सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे.या प्रकरणी सिव्हिल पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक यांनी माहिती दिली आहे.

# जैन धर्माचे २४ वे तीर्थकर भगवान महावीर मंदीरात जयंती साजरी

■हिवरखेड,दि १० (प्रतिनिधी)

हिवरखेड येथील सकल जैन समाजाचेच नव्हे तर अखील विर्श्वाला शांतीचा मार्ग दाखविनारे सर्वधर्माला शांतीचा संदेश देनारे मूक्या प्राणीमात्रावर दयेचा सागर बरसवीनारे जीयो और जीनेदो,अहींसेचा मार्ग दाखवत प्रेमाची शिकवन देनारे क्रोधाला शांतिने, दृष्टाला साधूमार्गाने,गरजुला दानाने,व असत्याला सत्याने चालन्याचा मार्ग दाखवनारे जैन धर्माचे २४ वे तीर्थकर मानव जातीला भगवान महाविरानी



कल्यानाचा मार्ग दाखविला असे भगवान महावीराची जंयती आज जैन मंदीरात पुरोहित पंडीताची जबाबदारी सांभाळनारे अतुल रमेश पीसोळे यांचे पौरोहितात महाविराना दुग्धाभिषेक करन्यात आला या वेळी पोलिस पाटील यांचे उपस्थीतीत माजी मूख्याध्यापक दे ना. महाजन रमेश पिसोळे,चंद्रकांत आंबेकर संतोष वालचाळे आकाश मसाळकर राजेश आंबेकर पत्रकार नेरकर यांचे ऊपस्थीत महापुजन यज्ञ व आरती करून साजरी करन्यात आली व सर्वानी महाविर भगवंताना त्रिवार मानवदंना दिली तर तर दे ना महाजन यांचे कडुन महाप्रसादाचे आयोजन करन्यात आले.

# कापूस सोयाबीन अर्थसहाय्य योजनेत २ लक्ष ४० हजार शेतकऱ्यांना निधी वितरीत

■अकोला,दि १० (प्रतिनिधी)

सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन अर्थसहाय्य योजनेत जिल्ह्यातील ३ लक्ष २० हजार ७०५ शेतकऱ्यांपैकी दि. ४ एप्रिल पर्यत २ लक्ष ४० हजार ८०७ शेतकऱ्यांना १११ कोटी ३ लक्ष ४७ हजार ७७० रूपये निधी वितरीत करण्यात आला आहे.



प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगामात स्थानिक नैसर्गिक आपत्ती (wide spread calamity) या बाबी अंतर्गत नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबतची अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. जिल्ह्यात कार्यरत एचडीएफसी अ‍ॅग्रो पिक विमा कंपनीने १५ दिवसांच्या आत स्थानिक नैसर्गिक आपत्ती (wide spread calamity) या बाबी अंतर्गत पात्र लाभाथी यांना नुकसान भरपाईची रक्कम रुपये ७७ कोटी अदा करण्यात येईल असे कळविले आहे. अशी माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातर्फे देण्यात आली च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन अर्थसहाय्य योजनेत जिल्ह्यातील ३ लक्ष २० हजार ७०५ शेतकऱ्यांपैकी दि. ४ एप्रिल पर्यत २ लक्ष ४० हजार ८०७ शेतकऱ्यांना १११ कोटी ३ लक्ष ४७ हजार ७७० रूपये निधी वितरीत करण्यात आला आहे.प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगामात स्थानिक नैसर्गिक आपत्ती (wide spread calamity) या बाबी अंतर्गत नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबतची अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. जिल्ह्यात कार्यरत एचडीएफसी अ‍ॅग्रो पिक विमा कंपनीने १५ दिवसांच्या आत स्थानिक नैसर्गिक आपत्ती (wide spread calamity) या बाबी अंतर्गत पात्र लाभाथी यांना नुकसान भरपाईची रक्कम रुपये ७७ कोटी अदा करण्यात येईल असे कळविले आहे. अशी माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातर्फे देण्यात आली

# तिर्थयात्री ट्रेनमधून जील्हातील ८०० ज्येष्ठ नागरिक आज होतील रवाना

■अकोला,दि १० (प्रतिनिधी)

भारतीय गौरव तीर्थ दर्शन ट्रेन अंतर्गत मुख्यमंत्री ज्येष्ठ नागरिक तीर्थ दर्शन योजना अंतर्गत अकोल्यातून ८०० भाविक प्लॅटफॉर्म क्रमांक तीन रेल्वे स्टेशन अकोला येथून ११ एप्रिल शुक्रवार रोजी अयोध्या येथे दुपारी दोन वाजता वाजता विशेष रेल्वे जाणार असून समाज कल्याण विभाग महाराष्ट्र सरकारच्या वतीने अकोला जिल्ह्यातील ८ ०० ८०० नागरिकांचा यात्रेमध्ये समावेश असून वारकरी पुजारी तसेच भोजनाची तसेच सर्व व्यवस्था या यात्रेमध्ये असून जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार एडवोकेट आकाश भाऊसाहेब फुंडकर, भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर खासदार अनुप धोत्रे यांच्या

## यात्रेकरुंचा लोकप्रतिनिधी करतील गौरव

उपस्थितीमध्ये त्यांना हिरवा झेंडा दाखवून विशेष ट्रेन रवाना होणार आहे. या संदर्भात जिल्ह्याचे नेते आमदार रणधीर सावरकर यांच्या विशेष प्रयत्नाने व मुख्यमंत्री तीर्थ योजना अंतर्गत ८०० भाविकांचा समावेश असलेली विशेष ट्रेन अकोल्यातून पहिल्यांदा जात असून यासाठी रेल्वे स्टेशन परिसर भगवा मुळे करण्यात आला असून यावेळी राम लक्ष्मण दरबाराचा देखावा तसेच वारकरी संस्कृती सनातन परंपरा नुसार जाणाऱ्या भाविकांचा स्वागत करण्यात येणार आहे रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म याची सजावट करण्यात आली असून यावेळी जिल्ह्याचे सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार असून भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. अकरा एप्रिल ला ही यात्रा सुरू होऊन १५ एप्रिल ला परत वारकरी तिर्थकरी परत येणार असून रेल्वे स्टेशनवर पालकमंत्री नामदार एडवोकेट आकाश फुंडकर, रेल्वेसाठी साठी विशेष पाठपुरावा करणारे लोकप्रतिनिधी आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे आमदार हरीश पिंपळे आमदार प्रकाश भारसाकळे , आमदार वसंत खंडेलवाल किशोर पाटील जयंत मसने विजय अग्रवाल गिरीश जोशी एडवोकेट डॉक्टर अमित कावरे , अंबादास उमाळे, माधव मानकर ह भ प खापरकर महाराज ,घू लोकेश तिवारी उपस्थित होते.

# आदेश्वर जैन मंदिरात एसपी बच्चन सिंह यांनी घेतले दर्शन

■अकोला,दि १० (प्रतिनिधी)

भगवान महावीर यांचा आज जन्म कल्याणक. भगवान महावीर यांनी संपूर्ण जगाला प्रेम आणि शांती, अहिंसा आणि अपरिग्रहचा संदेश दिला. भगवान महावीर जैनांत २४ वे तीर्थकर आहेत. त्यांच्या जन्मोत्सव निमित्त शोभायात्रा काढण्यात आली. दरम्यान, पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांनी श्री. आदेश्वर जैन मंदिर येथे दर्शन घेतले. संस्थान कडून त्यांचे स्वागत करण्यात आले. शहरात निघालेल्याशोभायात्रेत श्री. बाविशी भवन स्थानक जैन बांधव, श्री. वासुपूज्य जैन मंदिर, शास्त्री नगर जैन बांधव हे गांधी चौक पासून सहभागी झाले. लहान मुलाचे लेझीम पथक, मुला- मुलीची सजवलेल्या सायकल वर रॅलीत आणि मंगल वेशात महिला ही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# हनुमान जन्मोत्सवाची महानगरात निघणार भव्य शोभायात्रा


## अनेक आकर्षक देखावे व झाक्या वेधणार लक्ष्य

■अकोला,दि १० (प्रतिनिधी)

महानगरात गत नऊ वर्षा पासून दरवर्षी हनुमान जन्मोत्सव पर्वावर हनुमंता उत्सव व भव्य शोभायात्रा आयोजित करणाऱ्या हनुमान जन्मोत्सव समितीच्या वतीने यावर्षी ही हनुमान जन्मोत्सवाच्या दिनी महानगरात हनुमंताची भव्य शोभायात्रा आयोजित करण्यात आली असून यामध्ये चालती फिरती हनुमंताची झाकी तथा बाल हनुमंत वेशभूषा स्पर्धा हे या उत्सवाचे आकर्षण राहणार असल्याची माहिती हनुमान जन्मोत्सव समितीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत दिली. स्थानीय शासकीय विश्रामगृह येथे गुरुवारी संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेत हनुमान जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष संदीप पाटील,समिती सचिव योगेश बुंदेले,उपाध्यक्ष मनोज साहू,उत्सवाचे प्रमुख पाहुणे माजी आ. बबनराव चौधरी, अविनाश देशमुख, कृष्णा अंधारे, पंकज साबळे,मंगेश काळे,राजेश मिश्रा,रामप्रसाद मिश्रा पराग कांबळे आदी उपस्थित होते.बलाची देवता असणारे रामभक्त हनुमान यांचा जन्मोत्सव सर्वत्र शनिवार दि १२ एप्रिल रोजी साजरा करण्यात येत आहे. या हनुमान जन्मोत्सवच्या दिनी १२ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता राजराजेश्वर मंदिरापासून



अनेक देखावे,वारकरी दिंडी,भजनी मंडळ समवेत भव्य शोभायात्रा निघणार आहे. ही शोभायात्रा जयहिंद चौक, सिटी कोतवाली, गांधी चौक, वसंत टॉकीज मार्गे सिटी कोतवाली परिसरातील हनुमान मंदिराजवळ पोहोचून येथे पूजन व महाआरतीने या शोभायात्रेचे भक्तिभावात समापन करण्यात येणार आहे.आकर्षक अशा शोभायात्रेत हनुमंताच्या प्रतिमेस रथात विराजमान करून हा रथ भक्ताद्वारे ओढण्यात येणार आहे.तसेच शोभायात्रेत चालती फिरती हनुमंताची सजीव झाकी हे आकर्षणाचे केंद्र राहणार आहे. शोभायात्रा मध्ये महिला भजनी मंडळ, टाळकरी मंडळ व रामनामाचा गजर करीत असणाऱ्या महिलांच्या विशेष चमू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या हनुमान जन्मोत्सव निमित्त समितीच्या वतीने बच्चे कंपनीसाठी मोफत बाल हनुमान वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये विजेत्या बाल स्पर्धकास पारितोषिके देण्यात येणार आहे.महानगराच्या शक्ती व भक्तीचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या हनुमंताच्या या भव्य शोभायात्रेस अनेक संस्था संघटना, मंडळाचे सहकार्य लाभत असून महानगरातील समस्त महिला पुरुष हनुमान भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन ही शोभायात्रा यशस्वी करावी असे आवाहन यावेळी करण्यात आले.




RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# महात्मा फुल्यांची श्रेष्ठ प्रेरणा-समता-मानवता



महात्मा फुले हे केवळ चार्तुवर्ण्यावर-ब्राम्हण श्रेष्ठत्वावर एकूण विषमताधिष्ठीत हिंदू धर्मावर आघात करुन थांबले नाहीत. तो त्यांच्या बंडखोरीचा केवळ आवश्यक आणि प्राथमिक असा विध्वंसक अविष्कार होता, पण त्याहूनही श्रेष्ठ अशी फुल्यांची प्रेरणा होती. ती म्हणजे संपूर्ण समतेची, बंधुत्वाची, मानवतेची, विश्वकुटुंबाची त्यामध्ये वर्ण, जात तर सोडाच पण देश, धर्म, वंश या मधिल भेदांना त्यांच्या वृथा अभिमानाला यकिंचितही वाव नव्हता. वंश, धर्म, देश, कृत्रिम मनुष्यनिर्मिती, भेदभाव आहेत. त्यामुळे मुठभर स्वार्थी लोकांचाच स्वार्थ साधतो, त्यासाठी ते सामान्य जनतेमध्ये नसते भेदभाव, विषमता, राग-द्वेष निर्माण करतात. त्यापासुन द्वेष नाही. वंश, धर्म, देश मुक्त नाही, म्हणुन या सर्वांचा विलय करुन त्याहून श्रेष्ठ अशा मानवतेची, समानतेची, स्वातंत्र्याची, विश्वकुटुंबाची प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे, ही खरी फुल्यांची प्रेरणा होती, शिकवण होती.

-----------------

एकविसाव्या शतकाकडे नजर लावून बसलेल्या भारतात शिक्षण तळागाळापर्यंत पोहचू शकलेलं नाही हे वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आजही समाजात हक्कांची जाण आहे. पण कर्तव्याचा विसरच पडला आहे. आजही दीनदुबळे दलित अन्याय सोसतच आहेत. परहिता साठी अष्टाप्रहर राबणारा, झिजणारा शेतकरी, कामकरी, श्रमजीवी आजही दारिद्रयाचे आणि अन्यायाचे चटके अनुभवतच वाटचाल करत आहे.

शहरे सोडली तर आजही खेडोपाडी, डोंगरी भागात छोटी छोटी मुलं कामाला जुपली जात असल्यानं शिक्षणाला वंचितच आहेत. शांतता वर्षातही शांतता औषधालाही नाही. उलट जिकडे तिकडे द्वेषाचे, विद्रोहाचे अशांत वातावरण खदखदत आहे. आजही साक्षरतेचे प्रमाण फारच कमी आहे.

महात्मा फुल्यांनी अस्पृश्य मुलांसाठी शाळा काढली आणि ज्ञानांच दालन त्यांच्यासाठी खुले केले हे जरी खरे असले तरी विषमता आणि जातीभेद यांना आज देखील पूर्णपणे मुठमाती मिळू शकलेली नाही, ही वास्तविकता आहे.

शिक्षणाचा प्रसार जर तळागाळापर्यंत झाला तरच क्रांती होईल असं तर "विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली नीतीविना गती गेली गतीविना वित्त गेले आणि वित्तविना शुद्र खचले". शंभर वर्षापूर्वीची हिच स्थिती आजही आहे. माणसाच्या समुद्रात आज माणुसकीच हरवली आहे.

सामाजिक आणि आर्थिक विषमता याचं आजही पूर्णपणे उच्चाटन झालेले नाही. बंधुभाव फक्त ओठातच आहे.अशी स्थिती पाहिल्यावर महात्मा फुल्यांसारखी माणसं का बरं अस्वस्थ होणार नाहीत. आज जर महात्मा फुले आपल्यात असते तर त्यांनी आपल्या परखड विचारांच्या पवित्र्यांनी द्वेष, भ्रष्टाचार, अन्याय, दरिद्रय यांचा अंधःकार दूर करायचा नक्कीच प्रयत्न केला असता. आणि मग या विषयावर बोलायचा कदाचित प्रसंगही आला नसता.

हिंदू समाजातल्या मतलबी रुढींचा त्यांना तिरस्कार वाटू लागला. ज्योतिबांने शाळेतला अभ्यासक्रम पूर्ण करतांनाच 1847 पर्यंत ज्योतिबा बुध्दिने चांगले प्रौढ झाले होते. त्यांनी समाजाचे बारकाईने निरीक्षण केले. त्यातून त्यांच्या असे लक्षात आले की, आपला हिंदु समाज जातीभेदाने आणि विशिष्ट वर्गाच्या गुलामगिरीत राहिल्याने प्रतिगामी बनला आहे.

स्त्रियां आणि शुद्रांची कुचंबना होत आहे. हे सर्व स्त्रियां आणि बहुजन समाज शिक्षणापासुन दुर राहिल्यामुळे घडत आहे, असे त्यांच्या निदर्शनाला आले. त्यावरुन त्यांनी भावी जीवनातील कार्याची दिशा ठरविली. ते सरकारी नोकरीच्या मागे न लागता समाजकार्य करायचे ठरवून कामाला लागले. सामाजिक गुलामगीरी दूर करणे आणि सर्वांना शिक्षणाची दारे खुली करणे त्यासाठी प्रयत्नशील राहणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय ठरले.

हे कार्य तत्कालीन रुढीप्रिय समाजाला रुचले नाही. मुलींची शाळा काढण्यासाठी पूर्व तयारी म्हणून त्यांनी आपल्या पत्नीला प्रथम शिक्षण दिले. सावित्रीबाईंनी ही आपल्या पतीच्या जीवन कार्याला मनापासून सहाय्य केले.

1848 मध्ये पहिली 1851 मध्ये दुसरी आणि 1852 मध्ये तिसरी मुलींची शाळा काढली. या शाळा व्यवस्थित चालू लागल्या. मेजर कँडी यांनी सरकारतर्फे 75 रुपये अनुदान मंजुर केले. फुले यांच्या या महान सामाजिक कार्याचा गौरव म्हणुन त्यांचा सत्कार ही करण्यात आला. या नंतर ज्योतिबांनी सामाजिक सुधारणेकडे विशेष लक्ष द्यायचे ठरविले. व्यक्ति स्वातंत्र्य, समता आणि बुध्दि प्रामाण्य यासाठी ते झगडू लागले.

सतीची प्रथा, विधवा पूर्नविवाह, भृणहत्या (लहान मुलांची हत्या) या समाज विघातक गोष्टींना त्यांनी विरोध केला. केवळ शाब्दिक विरोध न करता त्यांनी पुढाकार घेवून "बालहत्या प्रतिबंधगृह" ही संस्था सुरु केली. समाजस्पृश्य-अस्पृश्य असा भेदाभेद पाळणाऱ्याचा रोष पत्करुन त्यांनी आपल्या घरी असलेला पाण्याच्या हौद सर्वांना म्हणजे अस्पृश्यांनाही खुला केला.

शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, हे लक्षात येताच अस्पृश्यासाठी, स्त्रियांसाठी त्यांनी शाळा उघडल्या, अनाथाश्रम काढले, वृत्तपत्र काढले. धर्म जन्माने न मिळता माणसाच्या स्वतःच्या बुध्दीने स्विकारला पाहिजे. शेतकऱ्यांच्या व्यथा इंग्रज प्रशासनाच्या कानी पोहोचविल्या.

शेतकरी हा समाजाचा कणा आहे. पोशिंदा अन्नदाता आहे, असे मत मांडले आणि जगजागृती केली. त्यांच्या साठाव्या वर्षी जनतेने मुंबईस त्यांचा नेत्रदिपक सत्कार करुन त्यांना "महात्मा" ही पदवी बहाल केली. सामाजिक समता, आर्थिक न्याय व शोषणमुक्ती यासाठी ज्योतिबाने अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले.

त्यांच्या पुरोगामी विचारांना कृतीची जोड मिळाली जणू ती मानवतेच्या कणवतेची बैठक होती. ज्योतिबांच्या कृतीमुळे, कर्तृत्वामुळे या समाजाची नवी पहाट उदयास आली. सावित्रीमाई भारतातील आद्यकांतीकारी थोर स्त्री होती. ज्योतिबांना सावित्रीमाईची सक्रीय साथ लाभली.

सामाजिक सुधारणेची सुरुवात आपल्या घरापासुन करणारे ज्योतिबाफुलें सारखे समाजसुधारक युगात होणे अशक्य आहे. सुधारकाग्रणी, संपूर्ण महाराष्टाचे भुषण, सुधारकांचे सुधारक त्यांच्या विचारांनी आणि धाडसी वृत्तीने कृत्तीने समाजाला जागे केले. काळाच्या खूप पुढे जाण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. हीन-दीन-जीवांना एकोणिसाव्या शतकात त्यांनी आपल्या विशिष्ट ध्येयासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले.

मानवी सामाजिक सुधारणेचे अवलोकन केले, परिस्थितीचे अवलोकन केले आणि प्रकाशमय मानवी स्वातंत्र्याच्या दिव्य युगाकडे सामाजिक माणसाच्या नवयुगाची ग्वाही देणारा आधुनिक भारतातील पहिला समाजक्रांतीकारक क्रांतिबा ज्योतिराव फुले नावाचा धगधगता लाव्हा तयार झाला.

कारण देशात जातीभेदाची सुनामी ऊफाळुन आली होती. त्यामुळे कोणी शुद्र नदीकाठावर वस्त्रधुत असता तेथे एखादा भट आला तर शुद्रास आपली सर्व वस्त्रे गोळा करुन भटाच्या अंगावर शिंतोडा येण्याचा संभव नाही, अशास्थळीजाऊन वस्त्रे धुवावी लागत.

भटाच्या अंगावर नकळत पाण्याचा शिंतोडा उडालाच तर भटाने रागाने अग्नीसारखे तप्त होऊन आपल्या जवळचे जड भांडे शुद्रांच्या डोक्यावर मारावे, ब्राम्हणावर तर सावली सुध्दा पडू नये याची पूर्णपणे खबरदारी शुद्राने वस्तीतून वाट असेल त्या वाटेवरुन जाण्यास सुध्दा धोका पत्करु नये असा कायदा, अशा कायद्याचे राज्य होते, त्यामुळे राज्यात अनेक छळवाद होते. स्त्रियांना तर त्या रुढीने बंदीस्तच करुन ठेवले होते.

पुरुषप्रधान व्यवस्थांच्या रणधुमाळी विषयी फुले म्हणतात की, स्त्री ही जात अबला असल्यामुळे तिच्यापूढे लोभी व धाडसी पुरुषांनी स्वतःचेच म्हणणे खरे केले आणि स्त्रीयांना मानवी हक्क समजू नयेत म्हणून पूर्ण अंधारात ठेवले. ज्योतिरावांना सावित्रीमाइंर्ची भक्कम साथ मिळाल्यानंतर त्यांनी विचार केला की, हे आता शुद्र अतिशुद्रांचा छळवाद बदलला पाहिजे. त्यावेळे पासून स्त्री चळवळीचा जन्म झाला.

महात्मा फुले आज जरी आमच्यात नाहीत परंतु कर्तृत्वाच्या रुपाने ते निश्चितच आमच्यांत आहेत. कारण जे दुस-यांसाठी मरतात, तेच खऱ्या अर्थाने जगतात आणि आपल्या कार्यकर्तृत्वाच्या रुपानं अमर असतात, म्हणजेच आपल्यातच असतात. आता हे जर खरं असेल तर महात्मा फुले देखील कार्यरुपानं आपल्यातच आहेत, असं नाही का तुम्हाला वाटत?

मला तर वाटतं, या विषयाच्या निमित्तानं ज्ञानज्योतीचं चरित्र आणि चारित्र्याचा आचार, विचार आणि उच्चाराचा जवळून परिचय व्हावा आणि आपण त्यांचे कार्य जोमानं, जिद्दीनं आणि निष्ठेनं करावं असंच बहुधा बहुतेकांना अपेक्षित असावं लौकिकथार्नं आज जरी महात्मा फुले आपल्यात नसले, तरी त्यांचे अलौकिक कार्य कलेकलेनं वाढतच राहणार आहे.आणि त्यांचे अस्तित्व तर नेहमीचे आपल्यात राहणार आहे.

ज्ञानज्योत प्रज्वलित केलेल्या ज्योतिबांना सामाजिक समता, मानवता, विवेक, विनय आणि नम्रता यावर प्रकाश टाकुन राष्ट्राला स्वायत्ततेच ध्येय गाठण्यासाठी गतिमान बनवायचं होतं. समाजजागरणाचा वसा घेतलेले स्त्रीशिक्षण आणि स्त्रीशक्ति जागृतीचा मंत्र निनादात ठेवणारे, आणि अस्पृश्यांबद्दल कणव आणि बंधुता बाळगणारे ज्योतिबा आज असते तर ! खरंच काय बरं वाटलं असतं त्यांना ?

आजही समाजात समता आणि बंधुता पूर्णपणे उतरु शकली नाही हे पाहून ते नक्कीच अस्वस्थ झाले असते. जयंती आणि पुण्यतिथी या दोन दिवशी आपली आठवण ठेवणारे, याच दिवशी आपल्या पुतळ्याला हार घालून खोटी पूजा करुन अवडंबर माजवणारे तथाकथित कार्यकर्ते आणि पुढारी पाहून त्यांना नक्कीच चीड आली असती.

फुले आणि आंबेडकरांचे हे अतूट नाते ध्यानात घेतले की, दोघांच्याही वैचारिक त्याचप्रमाणे व्याव्हारिक जीवनावरही नवाच प्रकाश पडतो. दोघांचे चरित्र आणि कतृत्व शेजारी शेजारी ठेवले. तर दोन्ही समजायला निःसंशय मदत होते. 63 वर्षे चंदनासारखे झिजले. प्रवास केला, व्याख्याने दिली, लेख लिहिले. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, विज्ञान, इहवाद या आधुनिक मुल्यांवर भर देऊन सामाजिक क्रांतीची प्रेरणा दिली.

डॉ. आंबेडकरांनी त्यांना गुरु मानले. सहज सोप्या भाषेत नेमकी स्पष्टता आणणे त्यांना जमत असे. विचारांना कृतिशीलतेची जोड दिली.

*जैसे बोलावे, तैसे चालावे,*
*मग महंतलीला स्वभावे, अंगी बाणे*

या समर्थवचनाची सार्थकता सिध्द करणारा हा महात्मा सर्व सुखाचे आगर नीतितत्त्वांचे माहेर अशा या महात्म्याचे अविरत कष्टाने 28 नोव्हेंबर 1890 मध्ये अनंतात विलीन झाले, त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

■ ■ ■



**प्रविण बागडे**
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

# स्त्रीयांचा उद्धारकर्ता महात्मा ज्योतीराव फुले

स्त्रीचा उद्धारकर्ता म्हणून महात्मा ज्योतीरावं फुले यांना ओळखले जाते. जातिबहिष्काराचे असहाय असे दडपण क्रियावान सुधारकांना सोसावे लागले. जिवलग नातेवाईकांचा विरोध सतत होत असे. परिणामी जोतीरावांचे वडील गोविंदराव यांनी मुलगा व सुन यांना घराबाहेर काढले.

ते माळी समाजाचे असून देखील माळी समाजाने त्यांची नाना प्रकारे अवहेलना चालू केली. या सर्व प्रतिकूल परिस्थितीला धैर्याने तोंड देऊन ज्योतीराव व सावित्रीबाई यांची समाजसुधारणेच्या क्षेत्रात आगेकूच सुरूच राहिली. नंतर रास्त पेठेत व वेताळ पेठेत दोन शाळा काढल्या. अस्पृश्यांसाठी शाळा काढली यास त्यांच्या प्रयत्नांना तत्कालीन मोठ मोठ्या विचारवंत समाजसुधारकांचा व राज्यकर्त्यांचाही पाठिंबा मिळत राहिला.

1852 मध्ये सरकारी विद्याखात्याकडून मेजर कॅन्डी यांच्या अध्यक्षतेखाली ज्योतिरावांच्या शिक्षण कार्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्या काळात हिंदूंच्या उच्च जातींमध्ये विधवा विवाह निषद्ध मानला होता. बालपणी व वारंवार उद्भवणाऱ्या प्राणघातक साथीच्या रोगामुळे पतीनिधन होऊन तरुणपणीच वैधव्य आलेल्यांची संख्या मोठी होती.


केशवपन केल्याशिवाय विधवा ही अपवित्र असे. अशा बाल व तरुण विधवांचा प्रश्न सोडविण्यासाठी सुरू झालेल्या पुनर्विवाहाच्या चळवळीत ज्योतिरावांचा पूर्ण सक्रिय पाठिंबा होता. वासनेला बळी पडलेल्या विधवांची फार विटंबना होत होती. गर्भपाताचे प्रयत्न होत. जन्मलेल्या बालकांची हत्याही होई.

त्यांना संरक्षण देण्यासाठी फुले यांनी बालहत्या प्रतिबंधकगृहाची स्थापना केली. या गृहात अशा स्त्रियांच्या बाळंतपणाची ही सोय केली होती.ज्योतिरावांनी पुढे जो 'यशवंत' नावाचा मुलगा दत्तक म्हणून घेतला तो काशीबाई नावाच्या ब्राह्मण विद्येचा मुलगा होता. विधवांच्या केशवपनाची चाल बंद व्हावी म्हणून त्यांनी चळवळ उभी केली व त्याकरता न्हाव्यांचा संपही घडवून आणला. अस्पृश्य व दलितांच्या प्रश्नालाही त्यांनी तितक्याच मनस्वीपणे चालना दिली.

अस्पृश्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही एक अत्यंत गंभीर अशी कायमची समस्या लक्षात घेऊन आपल्या वाड्यातील पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांसाठी खुला केला. महात्मा फुले हे नगरपालिकेचे सदस्य होते.

समाजाच्या मौलिक परिवर्तनाकरिता समाजरचनेतील धर्मभेद मूलक विद्वेष, जातीभेदमूलक उच्चनीच भाव, स्त्रीदास्य, हिंदू धर्म संस्थेतील मूर्तीपूजा, संस्कृत भाषेतील कर्मकांड या गोष्टीचे उच्चाटन करून समताप्रधान समाज निर्माण करण्याकरिता व अंधश्रद्धेचे निमुलन करून वैचारिक क्रांती करण्याकरिता सत्यशोधक समाजाची स्थापना फुले यांनी केली.

या सत्यशोधक समाजाचे सर्व धर्माचे व जातीचे नागरिक सदस्य व्हावेत अशी योजना केली होती. सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक या निबंधात फुले यांनी आपल्या समग्र विचारांचे सार असलेल्या 'विश्वकुटुंबबावादाची' सुसंगत मांडणी केली आहे. हा निबंध लिहीत असताना त्यांना पक्षपात झाला होता. अशा विकलांग अवस्थेत त्यांनी हा निबंध लिहून पूर्ण केला.



**सौ. चैताली संगोपाल वरघट**
मूर्तिजापूर, जि. अकोला.
9834583685

यात स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मूलभूत मानवी मूल्याच्या आधारावर समाज रचना कशी असावी, हे सांगितले आहे. ज्या तत्वांच्या आधारावर अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांती झाली तीच तत्वे या पुस्तकात भारतीय समाज रचनेच्या संदर्भात मांडली आहे.

यात सांगितलेल्या सत्यधर्म हा युटोपियाच होय. जगातल्या मोठमोठ्या सामाजिक व राजकीय क्रांत्या युटोपीयन धैर्यवादाने प्रेरित झालेल्या दिसतात. फुले म्हणतात स्त्री अथवा पुरुष एकंदर सर्व गावच्या, प्रांताच्या, देशाच्या व खंडाच्या संबंधाने आता कोणत्याही धर्मातील मतांच्या संबंधाने कोणत्याच प्रकारची आवड निवड न करणारे, या सर्व स्त्री-पुरुषांनी या भूगोलावर आपले एक कुटुंब समजून एकमताने, एकजुटीने एकमेकांशी सत्य वर्तन करून वागावे, इतकेच काय, एकाच घरात बौद्ध धर्मी बायको, खिस्त धर्मी नवरा, इस्लाम धर्मी कन्या व सार्वजनिक सत्यधर्मिपुत्र यांना प्रेमाने नांदायला लावील तोच खरा धर्म होय.

यात आर्थिक समता सुचित केली आहे आणि सत्यधर्मी समभाव स्वच्छ रीतीने मांडलेला आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांचा ' 'मानवतावाद'हा त्यांचा जीवनध्यास होता. त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी लढणारे महाराष्ट्रातील महात्मा ज्योतीरावं फुले पहिले समाज सुधारक होते.

ज्योतिरावांनी लोकशिक्षणाला महत्त्व दिले. जुलमी सावकारी विरुद्ध लढा देण्यासाठी पुणे व नगर जिल्ह्यात त्यांनी शेतकऱ्यांचे बंड घडवून आणले. हे बंड खतफोडीचे बंड या नावाने प्रसिद्ध आहे. जुन्नर तालुक्यात त्यांनी शेतकऱ्यांचा पहिला असहकार घडविला.

खतफोडीच्या बंडाशी संबंधित व्यक्ती म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले होय. त्यांना महाराष्ट्राचे 'मार्टिन ल्युथर किंग' असे संबोधले जाते. महात्मा फुले यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रातील चळवळी सुरू झाल्या. दलिततोद्धार चळवळ, कामगार चळवळ, ब्राह्मणेत्तर चळवळ, महात्मा ज्योतिराव फुले यांचे कार्य शिक्षण व समता यावर आधारलेले होते. या महात्म्याला विनम्र अभिवादन!!

■ ■

# ११ एप्रिल दिनविशेष

**महत्वाच्या घटना :**

१९१९: इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनची स्थापना झाली.
१९७०: अपोलो-१३ यानाचे प्रक्षेपण झाले.
१९७९: युगांडाचे हुकूमशहा इदी अमीन सत्ता सोडून पळून गेले.
१९७६: ॲपल कंपनीचे ॲपल १ हे कॉम्पुटर तयार झाले.
१९८६: हॅलेचा धूमकेतू पृथ्वीच्या सर्वात जवळ येत साडेसहा कोटी किलोमीटर अंतरावरून गेला.
१९९२: चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखक भालजी पेंढारकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला.
१९९९: अग्नी-२ या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी झाली.

**११ एप्रिल जन्म :**

१७५५: कंपवाताचा मानवी मेंदूशी संबंध आहे हे सिद्ध करणारे शास्त्रज्ञ जेम्स पार्किन्सन यांचा जन्म.
१७७०: ब्रिटनचे पंतप्रधान जॉर्ज कॅनिंग यांचा जन्म.
१८२७: : श्रेष्ठ समाजसुधारक तसेच श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची दास्याची मीमांसा करणारे क्रांतिकारक विचारवंत जोतिराव गोविंदराव फुले ऊर्फ महात्मा फुले यांचा जन्म.
१८६९: कस्तुरबा गांधी यांचा जन्म.
१८८७: चित्रकार जेमिनी रॉय यांचा जन्म.
१९०४: गायक आणि अभिनेते कुंदनलान सैगल यांचा जन्म.
१९०६: संस्कृत, प्राकृत, कोकणी या भाषांचे अभ्यासक डॉ. सुमित्र मंगेश कत्रे यांचा जन्म.
१९३७: लॉनटेनिस खेळाडू रामनाथन कृष्णन यांचा जन्म.
१९५१: अभिनेत्री रोहिणी हटंगडी यांचा जन्म.
१९२०: इटलीचे ४०वे पंतप्रधान एमिलियो कोलंबो यांचा जन्म
१९१०: पोतुर्गाल देशाचे १४वे राष्ट्राध्यक्ष, जनरल आणि राजकारणी अँटोनियो डी स्पिनोला यांचा जन्म
१६११: लिकटेंस्टाईनचे राजकुमार कार्ल युसेबियस यांचा जन्म

**११ एप्रिल मृत्यू :**

१९२६: अमेरिकन वनस्पतिशास्त्रज्ञ ल्यूथर बरबँक यांचे निधन.
१९७७: भारतीय लेखक फन्नीश्वर नाथ रेणू यांचे निधन.
२०००: कर्करोग संशोधन क्षेत्रातील अग्रणी शास्त्रज्ञ, पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित कमल समर्थ ऊर्फ कमल रणदिवे यांचे निधन.
२००३: टेक्सास इन्स्ट्रूमेंटचे स्थापक सीसिल हॉवर्ड ग्रीन यांचे निधन.
२००९: भारतीय लेखक व नाटककार विष्णु प्रभाकर यांचे निधन.
२०१५: जनरल लेफ्टनंट हनुतसिंग राठोड यांचे निधन.
२०१२: अल्जेरियाचे पहिले अध्यक्ष अहमद बेन बेला यांचे निधन

## मंत्रालयात नवे तंत्रज्ञान, पण जुन्या सवयी
# पासऐवजी कचऱ्याचा मारा!






मंत्रालयात प्रवेशासाठी डीजी प्रवेश नावाची अत्याधुनिक प्रणाली सुरू झाली आणि प्रशासनाने छातीठोकपणे घोषणा केली की, आता सगळं डिजिटल होणार, रांगा संपणार, आणि प्रत्येक अभ्यागताची नोंद ठेवली जाणार!

पण ही "नवी प्रणाली" प्रत्यक्षात कचऱ्याचा डबा बनली आहे, हे पाहून हसावं की रडावं हेच कळेनासे झाले आहे. डीजी प्रवेश ॲपद्वारे दुपारी दोननंतर अपॉइंटमेंट घेऊन मंत्रालयात येणाऱ्यांना गळ्यात अडकवण्यासाठी पास दिला जातो. हा पास बाहेर पडताना ड्रॉप बॉक्समध्ये टाकायचा, अशी सोपी योजना. पण आमच्या सर्वसामान्यांनी या डब्यात पासऐवजी कचरा, पाण्याच्या बाटल्या आणि बसची तिकिटे टाकून नव्या युगाची सुरुवातच वेगळ्या पद्धतीने केली आहे!

प्रशासनाने डब्यात पास मिळतील अशी अपेक्षा ठेवली, पण त्याऐवजी चुरमुरे, बिस्किटांचे पुडे आणि कोल्ड्रिंकच्या रिकाम्या बाटल्या मिळाल्या. एका अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले, "आम्ही पास गोळा करायला गेलो, तर डबा उघडताच दुर्गंधी आली. ही प्रणाली आमच्यासाठी की आम्हाला त्रास देण्यासाठी, हेच कळत नाही."

उन्हाळ्याच्या कडक ऊनात रांगेत उभे राहून पास मिळवणाऱ्या सामान्य माणसाला तर दुप्पट कष्ट पडत आहेत. एकदा रांगेत, आणि दुसरे काम होईल की नाही याची शाश्वती नसताना. मंत्रालयात येणाऱ्यांची नोंद ठेवण्याचा उद्देश डिजिटल प्रणालीचा होता, पण लोकांनी ड्रॉप बॉक्सला कचराकुंडी बनवून टाकले. "काम होत नाही, तरी कचरा तरी टाकून जाऊ," अशी भावना लोकांमध्ये दिसते. दरम्यान, रांगा कायम आहेत, उकाडा वाढलाय, आणि पास काढूनही कामाची खात्री नाही. प्रशासनाला आता नवे ॲप काढावे लागेल..कचरा व्यवस्थापनासाठी! खरंच, तंत्रज्ञान बदलले, पण माणसाच्या सवयी बदलायला अजून काही काळ लागेल, की काय?

■ ■ ■



दीपक कैतके

# दही खाण्याची योग्य पद्धत कोणती?



कधी आणि किती दही खाणे आरोग्यदायी उन्हाळ्यात दही खाण्याचे अनेक फायदे आहेत. दही आरोग्यासाठी फायदेशीर असते. परंतु दही योग्य पद्धतीने खाणे महत्वाचे आहे.

आयुर्वेदात दही खाण्याबाबत काही नियमही सांगितले आहेत. म्हणूनच दही कसे खावे? याबद्दल अनेक लोक गोंधळलेले असतात. दही योग्य पद्धतीने सेवन केल्यास त्याचे दुहेरी फायदे मिळू शकतात. पण जर तुम्ही दही खाताना काही चुका केल्या तर ते नुकसान देखील करू शकते.

**दही खाण्याची योग्य वेळ कोणती?**

दही खाण्याची योग्य वेळ कोणती? हा प्रश्न महत्वाचा आहे. दही खाण्याची योग्य वेळ सकाळचा नाश्ता मानली जाते. यामुळे नियमित नाश्त्यात दहीचा समावेश तुम्ही करू शकता. दही खाल्यामुळे पचनसंस्था सुधारते आणि पचनाशी संबंधित समस्या कमी होतात. दुपारच्या जेवणाच्या वेळी, दही, रायता किंवा ताक देखील जेवणासोबत घेता येते. हे तुम्हाला अन्न पचवण्यास देखील मदत करते. आयुवेर्दानुसार रात्री दही खाणे टाळावे. रात्री ते खाल्ल्याने पित्त आणि कफ विकारांची समस्या वाढू शकते.

**दही कसे खावे?**

दह्यात कोणतीही गोष्ट न मिसळता खाणे चांगले मानले जाते. जर तुम्ही साधे दही खाऊ शकत नसाल आणि तुम्हाला गोड दही खायला आवडत असेल तर थोडे मध, साखर किंवा गूळ त्यात मिसळू शकता. जर तुम्हाला खारट दही आवडत असेल तर हलके खारट दही खा. यासाठी तुम्ही दह्यात सेंधा मीठ किंवा काळे मीठ टाकू शकता. काही लोक तुपासोबत दही खातात, त्यामुळे तुमची पचनक्रिया सुधारते. दही फळ, भाज्यासोबत खाल्यास ते अधिक चांगले असते.



■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



# ज्ञान ज्योती

विद्येविना मती गेली
सांगती ज्योतिबा फुले
बहुजनांच्या दारिद्र्याचे
कारण स्पष्ट केले . . !

निरक्षरतेमुळे–
खचतो आत्मविश्वास
अंधश्रध्दा वशोषणाचे
पडती गळी फास

शाळा सुरु करूनी
मार्ग दाविला त्यांनी
चला आज नतमस्तक
होऊ त्यांच्या चरणी ..!

# अकोला शहरात निनादला 'जयमहावीर'चा जयघोष!

## भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव शोभायात्रा उत्साहात





▪अकोला,दि १० (प्रतिनिधी) संपूर्ण विश्वाला सत्य, अहिंसा, अपरिग्रह आणि ब्रह्मचर्याचा महान संदेश देणारे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जन्मकल्याणक महोत्सवात सकल जैन धर्मीयांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.जैन कल्याणक महोत्सवानिमित्त आदिनाथ जैन श्वेतांबर मंदिर, वासुपूज्य स्वामी जैन मंदिर, श्री संघवीजी जैन श्वेतांबर मंदिर, वर्धमान स्थानकवासी जैन संघ, जवाहर प्लॉट येथील भ. सुपार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, न्यू खेतान नगर येथील श्री १००८ भगवान महावीर दिगंबर जैन मंदिर, श्री स्थानकवासी जैन समाज मंदिर, सिव्हिल लाईन दिगंबर जैन मंदिर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासून जैन मंदिरांमध्ये कार्यकर्त्यांकडून विविध कार्यक्रम पार पडले.

# नव्याने जीर्णोद्धार झालेल्या मंदिरात होणार श्रीराम मुर्ति स्थापना

▪हिवरखेड,दि १० (प्रतिनिधी) हिवरखेड नजीकच्या तळेगाव बाजार येथे श्रीराम मंदिराचा जिणीद्धार करण्यात आला असून तीन दिवस विविध कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.ता. ११ एप्रिल २०२५ शुक्रवार ग्राम प्रदक्षिणा सकाळी ८.३० वाजता. पूजा आणि हवन: दुपारी ४:०० वाजता. १२ एप्रिल २०२५ शनिवार अभिषेक आणि पूर्णाहुती (मूर्ती प्राणप्रतिष्ठा) सकाळी ९.०० वाजेपासून. सुरु होणार यामध्ये भगवान श्रीराम, सीतामाताजी, लक्ष्मणजी, हनुमानजी, गणपतीजी, शिव-पार्वतीजी, नंदी, लक्ष्मी-नारायण, शीतला माता ग्राम देवता, इत्यादी देवी देवतांच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा होणार आहेत. तर ता. १३ एप्रिल २०२५ रविवार रोजी महाप्रसादाचा कार्यक्रम सकाळी ११.३० पासून सुरु होईल. सर्व कार्यक्रम श्रीराम मंदिर, तळेगाव (बाजार) ता तेल्हारा जिल्हा. अकोला येथे संपन्न होतील सर्व भाविकांनी उपस्थित राहावे. असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले.

जयनारायणजी रतनलालजी अग्रवाल, मुकूंद पुरूषोत्तमजी अग्रवाल, ओमप्रकाश पुरणमलजी अग्रवाल, राधेश्याम रतनलालजी अग्रवाल, घनश्याम रतनलालजी अग्रवाल, महावीर रतनलालजी अग्रवाल, आणि समस्त अग्रवाल परिवार, तळेगांव (बाजार) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### दि.अकोला- वाशिम जिल्हा मध्य. सहकारी बँके तर्फे

# हिवरखेड येथे ग्राहक प्रबोधन सभा संपन्न

▪अकोला,दि १० (प्रतिनिधी) आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त दि अकोला - वाशिम जिल्हा मध्य.सहकारी बँक शाखा हिवरखेड तर्फे ग्राहक प्रबोधन सभेचे माहेश्वरी भवन येथे दिनांक १० एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाचे उदघाटन सहकार महर्षी कै.डॉ.वा.रा.उपाख्य अण्णासाहेब कोरपे यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून द्विपप्रज्वलणाने झाले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष व उदघाटक कृषी उत्पन्न बाजार समिती तेल्हाराचे माजी सभापती मा.श्री.संदिपदादा खारोडे होते.तर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष जमीरउल्ला खां अमानउल्ला खां, हिवरखेडचे माजी उपसरपंच श्री. रमेशभाऊ दुतोंडे, कृ.उ.बाजार समितीचे माजी संचालक श्री.सुरेशभाऊ गिन्हे तसेच तालुक्यातील विविध सेवा.सह.सोसायटिंचे अध्यक्ष श्री.हरिदासभाऊ वाघ,श्री. गजाननभाऊ वानखडे, श्री. मनोहरलाल फाफट, श्री.ज्ञानदेवराव श्री.किशोरभाऊ खारोडे,श्री. महादेवराव तोरखडे, श्री. कैलासभाऊ रौदळे, श्री.प्रेम राजभाऊ म्हसाय, श्री. पदमाकरभाऊ इंगळे उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी बोलतांना श्री.हरिदासभाऊ वाघ यांनी जिल्हा बँक शेतकरी यांच्यासाठी मायमाऊली प्रमाणे काम करत असल्यामुळे शेतकऱ्यांनी आपली नाळ बँकेशी कायम ठेवा असे मत व्यक्त केले.तर श्री.रमेशभाऊ दुतोंडे व श्री.मनोहरलाल फाफट यांनी सेवा.सह.सोसायटी व जिल्हा बँक शेतकरी, ग्राहक यांच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील राहून कार्य करत असते असे मनोगत व्यक्त केले तर श्री. जमीरउल्ला खां यांनी माझी बँक जिल्हा बँक खरोखरंच माझी आहे अशी सेवा देते बँकेत पारिवारिक जिव्हाळा असल्याचे नमूद केले.

# शाश्वत सुखासाठी प्रभू चिंतन आवश्यक-हभप किशोर महाराज काळे

## शनिवारी महोत्सवाची आदर्श विवाहाने समाप्ती

▪अकोला,दि १० (प्रतिनिधी) मनुष्य जीवनभर कर्माच्या रहाटगाडग्यात गुरफटलेला असतो. अशा या चक्रात त्याच्याकडून कधी बऱ्यावाईट चुका व अनैतिक कर्म होत असते.अशा चुका व कुसंगती त्याला पतनाच्या खाईत घेऊन जाते. मात्र सातत्याने प्रभू स्मरण केले तर कोणतेही वाईट कर्म आपल्या हातून होऊ शकत नाही. म्हणून सदा सर्वदा प्रभू चिंतन करून वाईट कृतींना परित्याग करून शाश्वत जीवनाची अनुभूती प्राप्त करण्याचा हितोपदेश हभप किशोर महाराज काळे यांनी केला.कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने वानखडे नगर येथील कर्ता हनुमान मंदिर परिसरात गुरुवर्य वासुदेव महाराज व श्रीराम महाराज यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या कीर्तन उत्सवात तामशी येथील किर्तनकार हभप किशोर महाराज काळे यांचे कीर्तन संपन्न झाले.या कीर्तनात त्यांनी



जीवनातील वाईट कृतींना आळा घालण्यासाठी सत्संगाची कशी कास धरावी याचे सुंदर विवेचन सादर केले. संतांचे जीवनावर कसे परिणाम होतात याचे सुंदर उदाहरण त्यांनी आपल्या या कीर्तनात सांगून सुखी व समृद्ध जीवनासाठी व भगवंताचा अनुग्रह प्राप्त करण्यासाठी नेहमी सत्संगाची कास धरून भगवंताचे नित्य स्मरण करावे असे आवाहन केले.दरम्यान सकाळी व दुपारी उत्सव स्थळी भागवतकार वेदांताचार्य श्री श्री १००८ स्वामी वासुदेवानंद सरस्वती महाराज यांनी भागवत कथा साकार केली. भागवत हे आपले कर्तव्य कसे असावे याचे सखोल मार्गदर्शन करीत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.या सत्रात त्यांनी कृष्णलीला सादर करीत भागवताची उपयुक्तता प्रतिपादित केली.रामनवमी ते हनुमान जयंती उत्सव मध्ये अन्न सेवा वसंत माळी व संध्याकाळचे अन्नदाते राजेश जवरे, आरतीचे यजमान मनसेचे अकोला अध्यक्ष राजेश काळे, रामेश्वर माळी, विनायक धोरण होते.दुपारी योगीराज महिला भजनी मंडळचा भजन कार्यक्रम संपन्न झाला.कीर्तनात आज शुक्रवार दि ११ एप्रिल रोजी चांदुर रेल्वे येथील हभप संदीप महाराज तायवाडे यांचे कीर्तन होऊन शनिवार दि १२ एप्रिल रोजी सकाळी ९ वा. हभप स्वामी वासुदेवानंद सरस्वती महाराज यांच्या काल्याचे कीर्तन व दु १२ वाजता शेतकरी पाल्यांच्या आदर्श विवाहाने या महोत्सवाचे समापन करण्यात येणार आहे.

# सालासर बालाजी मंदिर येथे भव्य हनुमान जन्मोत्सवाचे आयोजन

## यंदा राहणार प्रयागराज कुंभमेळाचा देखावा

▪अकोला,दि १० (प्रतिनिधी) गंगानगर बायपास परिसरातील गत दहा वर्षापासून भक्ताच्या नवसाला पावणाऱ्या व अनेक भक्तिमय उपक्रम साकार करणाऱ्या सालासर बालाजी मंदिर येथे हनुमान जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सालाबादप्रमाणे यावर्षी ही हा हनुमान जन्मोत्सव शनिवार दि १२ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला असून यात अनेक कार्यक्रमाची रेलचेल राहणार असल्याची माहिती सालासर बालाजी सेवा समितीच्या वतीने गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.या हनुमान जन्मोत्सवात भक्तांसाठी प्रथमच प्रयागराज येथील कुंभ मेळ्याच्या देखावा सादर करण्यात येणार असून यात प्रयागराज येथील त्रिवेणी संगम, देव असुरांचा समुद्रमंथन देखावा, श्रीराम दरबार देखावा, काशी तीर्थक्षेत्र आदीचा देखावा साकार करण्यात येणार आहे. महानगरात प्रथमच भक्तांसाठी अशी देखाव्यांची भक्तिमय पर्वणी सालासर बालाजी सेवा समितीच्या वतीने साकार करण्यात आली आहे. हनुमान जन्मोत्सवाच्या दिनी सकाळी



५-३० वाजता भगवंताचा जन्मोत्सव पुरोहित व मान्यवर यजमानांच्या हस्ते भक्तीभावात संपन्न होणार आहे. या उत्सवाचे यजमान उद्योजक नंदकुमार अलीमचंदानी तथा राहुल मित्तल आपल्या कुटुंबासमवेत उपस्थित राहणार आहेत. उत्सवाच्या पूर्वसंध्येला शुक्रवार दि ११ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता महानगरातील ख्यातीप्राप्त अशा सालासर सत्संग मंडळाच्या वतीने भव्य सामूहिक सुंदरकांडचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तसेच सायंकाळी ७ वाजता हनुमान स्त्रोत व आरतीचे सामूहिक पठण करण्यात येणार आहे. उत्सवाची ही विहंगम झाकी भक्तांच्या दर्शनार्थ दिनांक १४ एप्रिलच्या रात्री पर्यत सुरू राहणार आहे.जन्मोत्सवाच्या या दोन दिवसीय महोत्सवात भाविक भक्तांसाठी विशेष व्यवस्था सेवा समितीने उपलब्ध केली असून परिसरात सेल्फी पॉईंट निर्माण करण्यात आले आहेत. तसेच बालकांसाठी उद्यान व खेळण्यासाठी अनेक स्टॉल परिसरात लावण्यात येत असून या भक्तिमय पर्वावर मंदिरात रंगीत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात येणार आहे.


# GOVERNMENT OF MAHARASHTRA
## AMRAVATI ELECTRICAL DIVISION,
## PUBLIC WORKS DEPARTMENT, AMRAVATI.

### TENDER NOTICE NO. 04 FOR 2025-2026

Online tenders in B-1 form are invited by Executive Engineer, Amravati (Electrical) Division, Public Works Division, Amravati on behalf of Governor of Maharashtra from qualified bidders for the following works under Manually Submittion Tender procedure.

| Sr. No. | Name of Work | Amount Put to Tender | E.M.D. |
|---|---|---|---|
| 1 | **Estimate No.312/EE/AKL/2024-25** Providing Repairing & Installation of New Tub Light Fitting, Ceiling Fan with E.I. in Various Building at G.M.C., Akola. | 613763.00 | 6200.00 |
| 2 | **Estimate No.06/EE/AKL/2025-26** Providing Internal Electrical Installation in Grain Godown at Patur, Dist. Akola. | 630097.00 | 6400.00 |
| 3 | **Estimate No.07/EE/AKL/2025-26** Providing CCTV Camera System to OPD Building at District Women Hospital at Akola. | 628529.00 | 6300.00 |
| 4 | **Estimate No.08/EE/AKL/2025-26** Providing CCTV Camera System to Various Ward & Hospital Building at District Women Hospital at Akola. | 470083.00 | 4800.00 |
| 5 | **Estimate No.09/EE/AKL/2025-26** Providing New Flood Light, Switchgear & Fire Extinguishers in Grain Godown at Patur, Dist. Akola. | 465713.00 | 4700.00 |
| 6 | **Estimate No.10/EE/AKL/2025-26** Providing Internal Electrical Installation in Grain Godown at Balapur, Dist. Akola. | 634054.00 | 6400.00 |
| 7 | **Estimate No.11/EE/AKL/2025-26** Providing New Street Light Around Grain Godown at Patur, Dist. Akola. | 629705.00 | 6300.00 |
| 8 | **Estimate No.12/EE/AKL/2025-26** Providing New Flood Lighsts, Switchgear & Fire Extinguisher in Grian Godown at Barshitakli, Dist. Akola. | 524931.00 | 5300.00 |
| 9 | **Estimate No.13/EE/AKL/2025-26** Providing New Street Light Around Grain Godown at Barshitakli, Dist. Akola. | 635134.00 | 6400.00 |
| 10 | **Estimate No.15/EE/AKL/2025-26** Providing E.I. to World Bank Project Sub Diviion Office at Akot, Dist. Akola. | 634947.00 | 6400.00 |
| 11 | **Estimate No.16/EE/AKL/2025-26** Providing Switchgears,Fire Extinguishers, Lan Wirirng & Fire Alarm System for Vulnerable Witness Court,Depostion Centre at Akola. | 560437.00 | 5700.00 |
| 12 | **Estimate No.17/EE/AKL/2025-26** Providing CCTV Camera Arrangement to New Swimming Pool in Krida Sankul at Akola. | 308933.00 | 3100.00 |
| 13 | **Estimate No.18/EE/AKL/2025-26** Providing Air Cooler in Gynic, Casulty Various Ward GMC at Akola. | 634722.00 | 6400.00 |
| 14 | **Estimate No.19/EE/AKL/2025-26** Providing Air Conditioner System in Video Conference Room New Administrative Building at District Collector Office, Akola. | 543296.00 | 5500.00 |
| 15 | **Estimate No.20/EE/AKL/2025-26** Providing New Street Light to Pradeshik Arogya Bhavan at Akola. | 497984.00 | 5000.00 |
| 16 | **Estimate No.21/EE/AKL/2025-26** Providing New Street Light to District Women Hospital at Akola. | 533322.00 | 5400.00 |
| 17 | **Estimate No.25/EE/AKL/2025-26** Providing New Street Light illumination to New swimming Pool in Krida Sankul at Akola. | 631302.00 | 6400.00 |
| 18 | **Estimate No.26/EE/AKL/2025-26** Providing Supply arrangement with Transformer for New Tahasil Quarter Building at Patur, Dist. Akola. | 595880.00 | 6000.00 |
| 19 | **Estimate No. 22/EE/AKL/2025-26** Providing Electrical Installation for Witness Court at Akola. | 623364.00 | 6300.00 |
| 20 | **Estimate No. 30/EE/AKL/2025-26** Providing Water Cooler in Various Wards GMC, Akola. | 599897.00 | 6000.00 |
| 21 | **Estimate No. 31/EE/AKL/2025-26** Providing CCTV Camera, Video Confererence (Audiable) System in Vulnerable Witness Court at Akola. | 499294.00 | 5000.00 |
| 22 | **Estimate No. 32/EE/AKL/2025-26** Providing CCTV Camera System to 3rd Floor of New Administrative Building of District Collector Office at Akola. | 613684.00 | 6200.00 |
| 23 | **Estimate No. 33/EE/AKL/2025-26** Providing Supple Arrangement & 8 Way Control Pannel to New Swimming Pool in Krida Sankul at Akola. | 567432.00 | 5700.00 |
| 24 | **Estimate No. 37/EE/AKL/2025-26** Providing Air Cooler in Administrative Building at GMC, Akola. | 634722.00 | 6400.00 |
| 25 | **Estimate No. 38/EE/AKL/2025-26** Providing Air Conditioner System for Court Hall & Witnes Room at Akola. | 513539.00 | 5200.00 |
| 26 | **Estimate No.40/EE/AKL/2025-26** Providing Electrical Installation to New Swimming Pool in Krida Sankul at Akola. | 4403340.00 | 4500.00 |
| 27 | **Estimate No.42/EE/AKL/2025-26** Providing Replacement of Faulty Battries of 2x100 KVA UPS On 3rd floor at Superspeciality Hospital, Akola. | 609560.00 | 6100.00 |
| 28 | **Estimate No. 43/EE/AKL/2025-26** Providing New Highmast In Premises Of Regional Transport Office Building, Akola. | 476798.00 | 4800.00 |
| 29 | **Estimate No.44/EE/AKL/2025-26** Providing & Erection of Decorative Street Light Pole at Ram Gopal Sansthan at Palso Badhe, Tq. & Dist. Akola. | 793889.00 | 8000.00 |
| 30 | **Estimate No.46/EE/AKL/2025-26** Providing Air Conditioner unit, Invertor, Water Purifier to Rest House Dhaba, Tq. Barshitakli, Dist. Akola. | 505062.00 | 5100.00 |
| 31 | **Estimate No.49/EE/AKL/2025-26** Providing CCTV Camera System to 1st floor of New Administrative Building of District Collector Office at Akola. | 613684.00 | 6200.00 |
| 32 | **Estimate No. 50/EE/AKL/2025-26** Providing Electrical Installtion to Rupnath Maharaj Sansthan at Dahihanda, Tq. Dist. Akola. | 591060.00 | 6000.00 |
| 33 | **Estimate No. 51/EE/AKL/2025-26** Providing Fire Alarm System And Fire Fighting Hydant System To Regional Transport Office, Akola. | 634333.00 | 6400.00 |
| 36 | **Estimate No.55/EE/AKL/2025-26** Providing Water Cooler in Administrative Building at GMC, Akola. | 599897.00 | 6000.00 |
| 37 | **Estimate No.56/EE/AKL/2025-26** Providing Replacement of Faulty Battries of 2x100 KVA UPS On 4th floor at Superspeciality Hospital, Akola. | 609560.00 | 6100.00 |
| 38 | **Estimate No.57/EE/AKL/2025-26** Providing Internal Electrical Installation for 2nd floor sub Divisional New Tahsil Office Building, Akola. | 605270.00 | 6100.00 |
| 39 | **Estimate No.60/EE/AKL/2025-26** Providing Fire Alarm System And Fire Extinguishers To Regional Transport Office, Akola. | 615416.00 | 6200.00 |
| 40 | **Estimate No.63/EE/AKL/2025-26** Providing Air Cooler at T.B. Ward and 210 Beded Nursing Hostel GMC, Akola. | 634722.00 | 6400.00 |
| 41 | **Estimate No.64/EE/AKL/2025-26** Supply & Erction of D.P. Structure at Govt.(Rural) Hospital Patur, Dist. Akola. | 603165.00 | 6100.00 |
| 42 | **Estimate No.65 /EE/AKL/2025-26** Providing New Highmast 2 Nos In Premises Of Woman Hospital, Akola. | 386379.00 | 3900.00 |
| 43 | **Estimate No. 66/EE/AKL/2025-26** Providing Internal Electrical Installation to Ram Gopal Sansthan at Palso Badhe, Tq. & Dist. Akola. | 556678.00 | 5600.00 |
| 44 | **Estimate No.67/EE/AKL/2025-26** Providing Mini High Mast Pole, Lan Wiring to World Bank Project Sub Division Office at Akot & Prov. Air Conditioner Unit to Sub Divisional Officer Qtr at Akot, Dist.Akola. | 381443.00 | 3900.00 |
| 45 | **Estimate No. 70/EE/AKL/2025-26** Providing E.I. to Shree Kshetra Kholeshwar Sansthan at Barshitakli, Dist. Akola. | 475808.00 | 4800.00 |
| 46 | **Estimate No. 71/EE/AKL/2025-26** Providing Street Light to New Tahsil Office Building, Akola. | 537746.00 | 5400.00 |
| 47 | **Estimate No. 73/EE/AKL/2025-26** Providing Air Cooler in Eye Ward Blood Bank at GMC, Akola. | 634722.00 | 6400.00 |
| 48 | **Estimate No,75/EE/AKL/2025-26** Providing Supply Arrangement with Transformer D.P.Structure for New Tahasil Building at Patur, Dist. Akola. | 605361.00 | 6100.00 |
| 49 | **Estimate No.78/EE/AKL/2025-26** Providing Replacement of Tubelight & Electrical acsessories at Administrative Offic New Collector Building, Akola. | 604664.00 | 6100.00 |
| 50 | **Estimate No.79/EE/AKL/2025-26** Providing Repairing of Fire Fighting, Fire Pump, Fire Alaram & Detection System Of Previously Installed All Fire System (Including Wing A & Wing B Fire System) In terms of Renewal of Fire NOC Year 2025-26 at District Women Hospital, Akola. | 388044.00 | 3900.00 |
| 51 | **Estimate No.80/EE/AKL/2025-26** Providing Water Cooler Boys Hostel UG-1 & UG-2, R.M.O. Hostel Plus Old at GMC, Akola. | 599897.00 | 6000.00 |
| 52 | **Estimate No.81/EE/AKL/2025-26** Providing Electrical Installation to Hall & Toilet in Uma nandi Sansthan at Mana, Tq. Murtizapur, Dist.Akola | 465693.00 | 4700.00 |
| 53 | **Estimate No. 83/EE/AKL/2025-26** Providing E.I. to Shree Kshetra Laksheshwar Sansthan at Lakhpuri, Dist. Akola. | 634273.00 | 6400.00 |
| 54 | **Estimate No.85/EE/AKL/2025-26** Providing CCTV Camera System to Parking Area of New Administrative Building of District Collector Office at Akola. | 635170.00 | 6400.00 |
| 55 | **Estimate No.86/EE/AKL/2025-26** Providing Water Cooler at Girls Hostel GMC, Akola. | 599897.00 | 6000.00 |
| 56 | **Estimate No.90/EE/AKL/2025-26** Providing CCTV Camera System to 2nd floor of New Administrative Building of District Collector Office at Akola. | 613684.00 | 6200.00 |

Tender form, conditions of contract, specifications and contract drawings can be **bidder must purchase the bidding documents via online mode from www.mahapwd.gov.in by clicking on "Pay PWD Online"** after entering the details, payment of Rs. 590/- (Including GST) (Rupees Five Hundred Ninety Only) should be paid online using payment gateway. The fees of tender document will be non refundable. Further information regarding the work can be obtained from the above office.

**: TENDER SCHEDULE :**

| | | |
|---|---|---|
| Cost of Tender Form | : | **Rs. 590/- Including GST** |
| Last Date & Place of Issue of Tender From | : | From 11.04.2025 Time 10.00 Hours<br>To 18.04.2025 Time 18.55 Hours |
| Receipt of EMD fees, to be paid FDR/B.G. Only. | : | Earnest Money in the form of Term Deposit Receipt for a period of one year issued by a scheduled bank duly endorsed in the name of the **Executive Engineer, P.W. Electrical Division Amravati** to be submitted in Envelop No. 1. |
| Receipt of online Tender Document fees, to be paid online only via Payment Gateway mode Only. | : | Document Tender Fee to be paid via online mode Only. |
| Last Date & Place of Manually Submission of Technical & Financial Tender | : | Office of the Executive Engineer, P.W. (Electrical) Division, Amravati.<br>Date 21.04.2025 Time 14.00 Hours |
| Performance Security Deposit | : | If the Lowest Tenderer has quoted below the Scheduled cost by more than 1%, he should submit Performance Security Deposite in the form of Bank Guarantee/Demand Draft/F.D.R. in the office of The Executive Engineer, Public Works (Electrical) Division Amravati within 8 days from the opening of envelop No. 2 as per Govt. Circular No. CAT/2017/C.No.08/Bld.-2, Dt. 26/11/2018. |
| Registration class of Contractor | : | Contractor Registered in Appropriate Class |

**Lr. No./Ex. En./(Ele.)/Amt./T.C./ 964/2025**

Office of the Executive Engineer (Electrical) Division

Amravati P.W. (Electrical) Division,

P.W.D. Compound, Camp, Amravati.

DGIPR-2025-26/No-5/C146

**Executive Engineer**
Amravati Electrical Division
Public Works Division
Amravati

# अस्मिता



## पर्याय चॉकलेट वॅक्सचा

**ब्युटी टॉक**

शरीरावरील अनावश्यक लव काढून टाकण्यासाठी वॅक्सिंगचा पर्याय निवडला जातो. मात्र साखरेच्या वॅक्ससोबतच अलिकडे चॉकलेट वॅक्स हा प्रकारही प्रचलित आहे. चॉकलेट वॅक्सच्या लाभांविषयी...

* साखरेच्या वॅक्समध्ये लिंबू, मधासारखे घटक असतात. हे घटक त्वचेला तजेला देतात. पण चॉकलेट वॅक्समध्ये कोको, सोयाबिन ऑईल, बदामाचं तेल, ग्लिसरिन, विविध प्रकारची जीवनसत्त्वं, ऑलिव्ह ऑईल असे घटक असतात. त्यामुळे चॉकलेट वॅक्समुळे त्वचेला जास्त पोषण मिळतं.
* कोरडी आणि संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी चॉकलेट वॅक्स करून घ्यायला हवं.
* चॉकलेट वॅक्समध्ये एसेन्शियल ऑईल्स असतात. यामुळे वॅक्सिंगनंतर त्वचा छान तजेलदार दिसते.
* उन्हामुळे त्वचा टॅन झाली असेल तर चॉकलेट वॅक्सचा पर्याय निवडा. यामुळे त्वचा उजळ दिसू लागते.
* चॉकलेट वॅक्समुळे वॅक्सिंग करताना होणाऱ्या वेदनांची तीव्रता कमी होते.
* काही वेळा साध्या वॅक्सिंगमध्ये अंगावरची लव पटकन निघत नाही. पण चॉकलेट वॅक्समुळे एकाच प्रयत्नात लव निघून जाते आणि तुमची त्वचाही छान मुलायम होते.
* वॅक्सिंग केल्यानंतर चॉकलेट वॅक्सचा मंद सुगंध दरवळू लागतो. हा सुगंध बराच वेळ टिकून रहातो. त्यामुळे आपल्याला ताजंतवानं वाटतं.

**सध्या महिला सक्षमीकरणासाठी नानाविध पातळीवर प्रयत्न होताना दिसतात. त्यांना समाजात सन्मान, मानाचे स्थान आणि सर्व पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळाव्या, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. असे असताना आकुर्ली मुंबई मेट्रो स्टेशन हे स्त्रीशक्ती आणि सक्षमीकरणाचे एक अनोखे उदाहरण म्हणून लक्षात घ्यावे लागेल कारण हे स्टेशन पूर्णपणे महिलांकडून कार्यान्वित केले जाते. इथे काम करणाऱ्या महिला कर्मचारी अत्यंत निष्ठेने आणि तत्परतेने आपली जबाबदारी पार पाडतात. म्हणूनच या सर्वांना मानाचा मुजरा करावासा वाटतो.**

## हे सक्षम महिलांचे स्टेशन




**मानिनी**

इथल्या महिला कर्मचाऱ्यांनी सांगितले की, त्यांना त्यांचे काम करण्याचा अभिमान वाटतो. ग्राहक संबंध व्यवस्थापन पर्यवेक्षक शिल्पा कैलाश अहिरे आपल्याला सांगतात, 'मी येथे व्यावसायिक विभागात काम करते. महसूल आणि ग्राहकांच्या सर्व तक्रारी हाताळते. इथे मी येणाऱ्या सगळ्या आव्हानांना तोंड देते आणि परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करते. मला माझ्या कामाचा अभिमान आहे. मी सध्या चार स्थानके हाताळत आहे त्यापैकी हे एक सर्व महिलांकडून कार्यान्वित होणारे स्थानक आहे.'

शिल्पा कैलाश पुढे सांगतात, 'अनेक महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मुख्य म्हणजे यातील काही अडचणींबाबत त्या पुरुष कर्मचाऱ्यांशी बोलू शकत नाहीत. अशा स्त्री कर्मचाऱ्यांना भावनिकदृष्ट्या योग्य पद्धतीने हाताळावे लागते. एका महिलेने दुसऱ्या महिलेला आधार दिला तरच ती सक्षम होऊ शकते.'

या स्टेशनमध्ये महिला कर्मचारी तीन शिफ्टमध्ये काम करतात. मेट्रो स्टेशन नियंत्रक म्हणून इथे मनीषा राजेंद्र सावंत जबाबदारी सांभाळतात. त्या म्हणतात, 'मी येथे स्टेशन नियंत्रक म्हणून काम करते. स्टेशनवर होणाऱ्या कामाचे व्यवस्थापन करणे ही माझी मुख्य जबाबदारी आहे. मी प्रवाशांशी संबंधित सर्व कामे हाताळते. हे नक्कीच एक आव्हानात्मक काम आहे, पण अशक्य नाही. महिला कोणतेही काम कुशलतेने हाताळू शकतात, हे आम्ही सिद्ध केले आहे. इथे तुम्हाला वाढीसाठी खूप वाव आहे.'

या मेट्रो स्टेशनमध्ये ट्रेन ऑपरेटर म्हणून कार्यरत असणाऱ्या निकिता महेंद्र धनावडेही मोकळेपणाने आपले मत मांडताना म्हणतात,'मला सरकारी कर्मचारी असल्याचा अभिमान आहे. गेल्या पाच वर्षांपासून मी इथे कार्यरत आहे. मेट्रो ट्रेन ऑपरेटर म्हणून माझी भूमिका खूप महत्त्वाची आहे. पण स्वत:ला खूप भाग्यवान समजते की, या नोकरीसाठी माझी निवड करण्यात आली. मी कोविडच्या आधीपासूनच इथे आले. कोविडदरम्यान, आम्हाला ऑनलाइन आणि ऑफलाइन प्रशिक्षण मिळाले. हे प्रशिक्षण हैदराबादमध्ये पूर्ण केले. मला या कामाचा आणि सरकारी कर्मचारी असल्याचा अभिमान आहे. माझी जबाबदारी लोकांना त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचवणे ही आहे. वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत आम्ही प्रवाशांना त्वरित मदत देण्याचा प्रयत्न करतो. समाजही आमच्या या कामाचा आणि महत्त्वपूर्ण भूमिकेचा गौरव करतो.' तेव्हा आगामी काळात अशा मानिनींची संख्या वाढेल अशीच अपेक्षा करु या.

## कलिंगड खरेदी करताना...

**स्मार्ट खरेदी**

उन्हाळ्यात टरबूज अर्थात कलिंगड खायला कोणाला आवडत नाही! उष्णतेपासून सुटका देणाऱ्या या थंडगार आणि रसरशीत फळाचे आवडीने वेगवेगळ्या प्रकारे सेवन केले जाते. पण टरबूज कसे खरेदी करायचे हे सर्वांनाच माहिती नसते. स्वाभाविकच अगोड, फुकट रंगाचे टरबूज पाहून विरस होतो. तेव्हा योग्य टरबूज खरेदी करण्यासाठी काही गोष्टी नक्की लक्षात ठेवा.

**वजन तपासा**

चांगले टरबूज जड असते. टरबूज हलके असेल तर आतून कोरडे किंवा रंगहीन असण्याची शक्यता असते. म्हणूनच टरबूज खरेदी करताना त्याचे वजन तपासा. गोड टरबूज वजनाला जड असते. जड असण्याचे कारण म्हणजे त्यात पाणी असते आणि रसाळही असते. टरबूज सुकले असता आतील पाणीही सुकते आणि खाताना गोडीही कमी वाटते.



**रंग आणि पोत तपासा**

चांगल्या टरबूजाचा रंग एकसारखा आणि चमकदार असतो. त्याचमुळेच कलिंगडाचा रंग असमान असेल तर ते आतून खराब असल्याची दाट शक्यता असते, हे लक्षात घ्या. तसेच खरेदी करताना टरबूजाचा पोत तपासा. चांगल्या टरबूजाचा पोत पातळ असतो. मात्र त्याची साल खूप मऊ नसते. त्यामुळे साल खूप मऊ असेल तर ते टरबूज फिके निघते, हे लक्षात ठेवा. चांगले कलिंगड वरच्या बाजूला थोडा कठीण असते.

**पिवळा डाग तपासा**

टरबूज बारकाईने बघितले तर त्यावर एक लहान पिवळा डाग दिसतो. टरबूजावर हा पिवळा डाग असेल तर समजून घ्या की फळ व्यवस्थित पिकले आहे आणि आतून लाल आहे. सूर्यप्रकाशामुळे कलिंगड शेतात असताना त्यावर हा डाग दिसतो. मात्र ते नसल्यास ते कच्चे वा रसायनांचा वापर करुन पिकवले असल्याचा धोका असतो. असे कलिंगड बेचव लागते. म्हणूनच पिवळसर डाग असणारे कलिंगड खरेदी करा. हे फळ आतून गोड असल्याचे प्रमुख लक्षण आहे.

## पीएचडीची तयारी?

**स्कील डेव्हलपमेंट**

अनेक महिलांना उच्च शिक्षण घ्यायचं असतं. संशोधन करायचं असतं. आपल्या आवडत्या विषयात पीएचडी करण्याची इच्छा असते. पण अनेक कारणांमुळे महिला पीएचडी करायला घाबरतात. यासाठी वेळ देता येईल का नाही, अशी भीती त्यांना वाटते. पण पीएचडीसारखी पदवी मिळवल्यामुळे महिलांचा आत्मविश्वास अनेक पटींनी वाढू शकतो. पीएचडीच्या दिशेने पाऊल पुढे टाकताना काय करता येईल याविषयी...

* पीएचडीचा कालावधी तीन ते सहा वर्षांपर्यंत असू शकतो. या काळात खूप संशोधन करावं लागतं. एवढी वर्ष एखाद्या विषयातला रस टिकून रहाणं गरजेचं असतं. त्यामुळे आपली आवड ओळखून मगच पीएचडीचा विषय निवडा.
* पीएचडीचा विषय ठरवताना ऑनलाईन संशोधन तुमच्या कामी येऊ शकतं. काही संस्थांमध्ये मास्टर्स आणि पीएचडी असे दोन्ही अभ्यासक्रम एकत्रित पूर्ण करता येतात.



* भारतासह परदेशात पीएचडी करण्याचा पर्यायही तुमच्याकडे आहे. अमेरिका, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियासह युरोपियन देशांमध्येही अनेक संधी आहेत. इथे तुम्हाला स्कॉलरशीपही मिळू शकते.
* पीएचडीसाठी तीन ते पाच वर्ष देण्याबाबत मनात शंका असेल तर मास्टर्सपासून सुरुवात करा.
* विविध विद्यापीठे, संस्थांमध्ये पीएचडी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तेव्हा विविध विद्यापीठांमध्ये अर्ज करत रहा. या क्षेत्रातल्या संधींचा शोध घ्या.

## सर्वात मोठे आव्हान



**समाजभान**

आजकाल इंटरनेट आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनले आहे. शिक्षण, काम आणि मनोरंजनासाठी त्याचा वापर होतो. तथापि, इंटरनेटवर अशाही काही गोष्टी आहेत ज्या समाजासाठी हानिकारक ठरत आहेत. अशीच एक गोष्ट म्हणजे पोर्नोग्राफिक साइट्स. या स्थळांना भेट देणाऱ्या लोकांची संख्या सातत्याने वाढत आहे. एका अहवालानुसार, भारतात पॉर्न चित्रपट पाहण्याचा ट्रेंडही वाढला असून सुमारे १२ टक्के वेबसाइट्स पोर्नोग्राफिक चित्रपटांशी जोडलेल्या आहेत. आजकाल लोकांना पोर्नोग्राफिक चित्रपट सहज पाहता येतात. त्यातच १८ वर्षांखालील ९० टक्के मुले आणि ६० टक्के मुलींनी कधी ना कधी अश्लील चित्रपट पाहिले असल्याचे हा अहवाल सांगतो. आज पहिल्यांदा पॉर्न पाहण्याचे सरासरी वय १२ वर्षे मानले जात आहे. म्हणूनच ही बाब संगोपनाच्या तसेच सामाजिक स्वास्थ आणि स्त्री सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

पोर्नोग्राफिक चित्रपटांमध्ये अंदाजे ८८ टक्के शारीरिक हिंसाचार असतो, ४८ टक्के प्रकरणांमध्ये तोंडी हिंसाचार असतो आणि ९४ टक्के महिलांना लक्ष्य होताना दाखवले जाते. या व्हिडिओमध्ये पुरुष नेहमीच शक्तिशाली तर महिलांना आज्ञाधारक दाखवले जाते. ही बाबही पुरुष आणि महिलांमधील असमानता प्रतिबिंबित करते आणि महिलांवरील लैंगिक हिंसाचाराला प्रोत्साहन देते.

या अहवालात असेही म्हटले आहे की, पोर्नोग्राफिक चित्रपट पाहण्याच्या बाबतीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे तर बलात्काराच्या घटनांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. लैंगिक हिंसाचाराचा महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. भारतात दररोज अंदाजे ९३ महिलांवर बलात्कार होतात. तेव्हा बलात्काराच्या या वाढत्या घटनांमुळे पोर्नोग्राफिक चित्रपट आणि लैंगिक हिंसाचार यांच्यातील संबंध तपासण्याची गरज आता व्यक्त होत आहे.

इंटरनेटवरील अश्लील सामग्रीविरुद्ध सरकारने बरेच नियम केले आहेत. माहिती तंत्रज्ञान कायदा २००० अंतर्गत, इंटरनेटवर अश्लील सामग्री पसरवणे किंवा पोस्ट करणे हा गुन्हा आहे. एखाद्या व्यक्तीने असे केले तर त्याला शिक्षा होऊ शकते. मुलांच्या बाबतीत हा कायदा आणखी कडक आहे, जेणेकरून मुलींना तसेच लहानग्यांना ऑनलाइन शोषणापासून वाचवता येईल. मात्र असे असले तरी सगळ्यांना त्याची जाण नाही. ती निर्माण करणे हे आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान आहे.



## आहारात हव्या चिया सीड्स



**स्टे हेल्दी**

चिया सीड्स अर्थात चिया बिया सध्या अनेकांच्या आहाराचा एक महत्त्वाचा भाग आहेत. या लहान बियांमध्ये कॅल्शियम, मॅंगनीज, मॅग्नेशियम, सेलेनियम, तांबे, लोह आणि फॉस्फरस भरपूर प्रमाणात असते. त्यामध्ये अँटीऑक्सिडंट, अल्फा-लिनोलेनिक ॲसिड, ओमेगा-३ फॅटी ॲसिड आदींचे प्रमाण देखील जास्त प्रमाणात असते. अनेक अभ्यासातून दिसून आले आहे की, चिया सीड्स आहारात असल्यास हृदयरोग आणि कर्करोगाचा धोका कमी होतो. खरेज वजन कमी करण्यासाठी देखील त्यांचे सेवन फायदेशीर ठरते.

असे असताना तुम्ही केवळ दोन आठवडे दररोज आहारात या बियांचा समावेश केला तर आश्चर्यकारक परिणाम बघायला मिळतील. कारण चिया सीड्समध्ये विरघळणारे फायबर भरपूर प्रमाणात असते. विरघळणारे फायबर पाण्याशी संयोग साधून जेलसारखा पदार्थ तयार करते. हा घटक मल मऊ करतो तसेच पचनास मदत करतो. या बियांमध्ये ४० टक्के फायबर असल्यामुळे मलावरोधाची समस्या दूर होते आणि पचनसंस्था वेगाने सुधारते.

चिया सीड्स प्री-बायोटिक म्हणूनही काम करतात. त्यामुळेच आतड्यांच्या आरोग्यरक्षणात त्यांची महत्त्वाची भूमिका दिसते. प्री-बायोटिक्स संयुगे आतड्यांमधील चांगल्या बॅक्टेरियांना पोषण देतात आणि त्यांच्या वाढीस तसेच संतुलित मायक्रोबायोम राखण्यास मदत करतात. हे सर्व आतड्यातील सूक्ष्मजीव पचन, रोगप्रतिकारक शक्ती आणि मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी महत्त्वाचे ठरते. तज्ज्ञांच्या मते, चिया बियांमध्ये असणारे फायबर प्री-बायोटिक म्हणून काम करणाऱ्या आतड्यांतील फायदेशीर बॅक्टेरियांना पोषण देत असल्यामुळे आतड्यांना मजबुती मिळते आणि आरोग्य सुधारते.

तुम्ही दोन आठवडे दररोज चिया बियाचा आहार समावेश केला तर आतडे हायड्रेट राहण्यास मदत होते कारण या सीड्स खाल्ल्यानंतर तुम्ही जास्त पाणी पिता. स्वाभाविकच यामुळे हायड्रेशन वाढते आणि पचनसंस्थेच्या समस्या टाळता येतात. तज्ज्ञांच्या मते, चिया सीड्स वजनाच्या १० पट पाणी शोषून घेतात आणि एक जेल तयार करतात. हे जेल शरीर हायड्रेटेड ठेवण्यास मदत करते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे चिया बियांमधील विरघळणारे फायबर रक्तातील साखरेचे शोषण कमी करते. स्वाभाविकच यामुळे रक्तातील साखरेची वाढ रोखली जाते.

## सदाबहार जीन्स

**स्टाईल स्टेटमेंट**

बाजारात विविध प्रकारच्या जीन्स उपलब्ध आहेत. प्रत्येक जीन्सची स्वत:ची खासियत आहे. तेव्हा तुमच्या वॉर्डरोबमध्येही यापैकी काही जीन्स असायलाच हव्यात. अशाच काही ट्रेंडी जीन्सवर एक नजर टाकू या.

* कम्फर्ट आणि स्टाईल या दोहोंचं मिश्रण फ्लेअर ॲंकल स्कीनी जीन्समध्ये आढळतं. या जीन्सवर लाँग शर्ट किंवा टॉप घालता येईल.
* फ्लेअर लेग जीन्स हा प्रकारही इन आहे. यावर शॉर्ट शर्ट किंवा टॉप घाला. या जीन्ससोबत बूट किंवा मोजडी घालता येतील.
* कूल लूक्साठी स्ट्रेट लेग जीन्स ट्राय करता येईल. त्यावर ऑफ शोल्डर किंवा क्रॉप टॉप घाला.
* स्लीम वाईड लेग्ड जीन्स हा प्रकार सदाबहार आहे. त्यावर कोणत्याही प्रकारचा टॉप, शर्ट किंवा कुर्ता चांगला दिसेल.
* स्कीनी जीन्सवर टी शर्ट किंवा क्रॉप टॉप घालता येईल.
* क्लासी लूकसाठी बूटकट जीन्स ट्राय करा.
* पलाझो स्टाईल वाईड लेग जीन्स हा प्रकारही इन आहे. ही जीन्स तुम्हाला हटके लूक देऊन जाईल.
* पेपर बॅग वेस्ट पॅंटवर ट्यूब टॉप ट्राय करता येईल.

**स्कीन केअर**

### वापरा सायीचं स्क्रब



दुधावरची साय त्वचेसाठी वरदान ठरु शकते. सायीपासून छानसा फेस पॅक तयार करता येईल. यासाठी चमचाभर साय घ्या. त्यात अर्धा चमचा ओट्स घाला. हे मिश्रण स्क्रबप्रमाणे काम करेल. यामुळे मृत त्वचा दूर होईल. त्वचेचा काळपटपणा कमी करण्यासाठी या स्क्रबचा नियमित वापर करा.

**स्मार्ट टिप्स**

### टिकवा दागिन्यांची झळाळी

सतत वापरल्यामुळे दागिन्यांची झळाळी कमी होते. त्यातही चांदीचे दागिने लवकर खराब होतात. या दागिन्यांची चमक टिकवण्यासाठी जरा जास्तच काळजी घ्यायला हवी. त्यातील एक भाग म्हणजे कधीही चांदीचे दागिने बाहेर ठेऊ नयेत. शक्यतो ते कापसात गुंडाळून ठेवावेत. चांदीच्या दागिन्यांना पाणी लागणार नाही याची काळजी घ्यावी.



**हेअर केअर**

### उपयुक्त व्हिनेगर

व्हिनेगर केसांसाठी लाभदायी आहे. यामुळे स्कॅल्पचा पीएच बॅलन्स टिकून रहातो. केस स्वच्छ ठेवण्यासाठी व्हिनेगर वापरता येईल. यामुळे केस छान चमकदार होऊ शकतील. केसांचा कोरडेपणा दूर करण्यासाठीही व्हिनेगर लावता येईल. यामुळे केस गळण्याची समस्याही कमी होऊ शकेल.



# वक्फची अतिक्रमित जमीन मोकळी होणार?

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. १० :

वक्फ बोर्डांना नियंत्रित करणारे दुरुस्ती विधेयक पारित झाले. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर बुधवार, ९ एप्रिलपासून देशात वक्फ कायदा लागू झाला आहे. त्यानंतर आता राज्य सरकारही ॲक्शन मोडवर आले असून राज्यातील वक्फ मालमत्तांची अचूक आणि नेमकी आकडेवारी मिळावी याकरिता जिओ मॅपिंग करण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान, महाराष्ट्रात वक्फची ५० टक्के जमीन अतिक्रमित असून हिंदूंची मालमत्ता आणि शेतजमिनीवरही ताबा सांगिल्याचे समोर आले आहे.

राज्यात वक्फ बोर्डाच्या जमिनींबाबत सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रातील वक्फ बोर्डाच्या अखत्यारीतील मालमत्ता आणि जमिनींचे जिओ मॅपिंग लवकरच सुरू करण्याचा निर्णय अल्पसंख्याक विभागाकडून घेण्यात आला आहे.

या निर्णयामुळे राज्यभर विखुरलेल्या आणि कोणतेही मोजमाप नसलेल्या जमिनींवर बेकायदेशीररीत्या कब्जा करणाऱ्यांना दणका बसणार आहे. जिओ मॅपिंगमुळे राज्यात वक्फच्या किती मालमत्ता आहेत, त्यावर किती अतिक्रमण आहे याची अचूक अधिकृत माहिती उपलब्ध होणार असून अतिक्रमणावर टाच येणार आहे.

मुंबई वक्फ (दुरुस्ती) विधेयक, २०२५ वरून देशभरात वाद सुरूच आहे. वक्फ (दुरुस्ती) विधेयक दोन्ही सभागृहांनी मंजूर केले आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील वक्फ जमिनीबाबत धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या (एमएसबीडब्ल्यू) आकडेवारीनुसार, राज्यातील वक्फ जमिनीपैकी जवळजवळ निम्मी जमीन अतिक्रमित आहे.

वक्फ कायद्याच्या कलम ५५ अंतर्गत अतिक्रमण हटवण्याचे आदेश देण्यात आलेल्या ४८३ प्रकरणांमध्ये जिल्हा जिल्हाधिकारी कार्यालयाने कोणतीही कारवाई केलेली नाही. गेल्या काही वर्षांत बोर्ड आणि ट्रिब्युनलने मालमत्तांच्या पुनर्संचयनासाठी २१ आदेश जारी केले आहेत, परंतु कोणतीही कारवाई झालेली नाही. राज्यात सध्या वक्फच्या २३,५६६ मालमत्ता नोंदणीकृत आहेत. क्षेत्र ३७३३० हेक्टर इतके आहे.

वक्फच्या मालमत्तांवर मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. मात्र, यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी कोणत्याही पद्धतीने मालमत्तेचा ताळमेळ घेतला गेला नव्हता. आता जिओ मॅपिंग तंत्रज्ञानामुळे मालमत्ता आणि अतिक्रमणाची स्पष्टता येणार असून सरकारी पातळीवर अधिकृत माहिती उपलब्ध होईल.

छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील डॉ. आंबेडकरस्मारकाच्या जागेवर वक्फ बोर्डाने दावा केला होता. त्याचप्रमाणे धुळे शहरातील चंद्रशेखर आझादनगरमधील ३२९८ घरांवर, लातूर जिल्ह्याच्या अहमदपूर तहसीलमधील तळेगाव गावातील १०३ शेतकऱ्यांच्या ३०० एकर जमिनीवर, दौंड तहसीलमधील पारगावमध्ये ग्रामपंचायतीने राखीव ठेवलेल्या बागेच्या जागेवर, औसा तहसीलमधील बुधोदा गावातील २५ शेतकऱ्यांच्या १७५ एकर जमिनीवर, कोल्हापूर जिल्ह्यातील वडंगे गावातील महादेव मंदिर जागेवर वक्फ बोर्डाने दावा केला आहे.

अल्पसंख्याक आयोगाच्या अहवालात दिल्लीतील ६ मंदिरांवरील वक्फ बोडार्चा दावा उघड झाला आहे. हा अहवाल २०१९ मध्ये आला होता. दिल्लीतील अनेक मंदिरे वक्फ बोर्डाच्या जमिनीवर बांधली गेली आहेत, असा दावा करण्यात आला होता.

गेल्या काही वर्षांत वक्फ बोर्डाने वक्फ कायदा, १९९५ च्या कलम ५४ अंतर्गत वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणाशी संबंधित दाखल केलेल्या १,०८८ प्रकरणांमध्ये कायदेशीर कारवाई केली आहे. या प्रकरणांपैकी या हडप केलेल्या मालमत्तांवरील अतिक्रमण हटवण्यासाठी फक्त २१ आदेशांची अंमलबजावणी करण्यात आली आहे, तर २५० प्रकरणे वक्फ बोर्ड आणि न्यायाधिकरणाकडे पुनरावलोकनासाठी प्रलंबित आहेत.

# माजी आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे राजकारणात

■ महासागर प्रतिनिधी

अकोला, दि. १० :



माजी आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे यांनी "हिंद सेना' नावाचा राजकीय पक्ष स्थापन करुन बिहारच्या राजकारणात एन्ट्री केली आहे. त्यांनी ८ एप्रिल रोजी पाटणा येथे हिंद सेना पक्षाची घोषणा केली आहे.

बिहारमध्ये भारतीय पोलिस सेवेत दबंग आयपीएस अधिकारी म्हणून नावलौकिक मिळवलेल्या शिवदीप लांडे यांनी अखेर राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. बिहारच्या विधानसभा निवडणुकीची तयारी त्यांच्या पक्षाने सुरू केली आहे. २००६ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले लांडे यांची पोस्टिंग बिहारमध्ये झाली होती. १९ सप्टेंबर २०२४ मध्ये त्यांनी अचानक पोलिस सेवेतून निवृत्तीची घोषणा केली होती. मात्र, जानेवारीमध्ये त्यांचा राजीनामा मंजूर झाला होता. मी बिहारमध्ये १८ वर्ष काम करून सेवा दिली. बिहार माझे कुटुंब आहे. जर माझ्याकडून नकळत काही चुकले असेल तर बिहारच्या जनतेने माफ करावे. आज मी पोलिस दलाचा राजीनामा देत आहे. पण बिहारसाठी यापुढेही काम करत राहिल, अशी पोस्ट तेव्हा लांडे यांनी समाजमाध्यमांवर लिहिली होती.

आपण नोकरीची सुरुवात जय हिंद बोलून केली होती. त्याच उत्साहात आता राजकीय क्षेत्रात पदार्पण करत आहे. युवकांसाठी युवकांच्या माध्यमातून काम करणारा पक्ष, अशी आपल्या पक्षाची ओळख असेल. युवकाला आज बदल हवा आहे. पण हा बदल घडवणार कोण? असा प्रश्न आहे. आम्ही युवकांसाठी एक माध्यम बनू इच्छितो, असे त्यांनी पक्षाची घोषणा करतेवेळी सांगितले.

शिवदीप लांडे हे मूळचे पारस गावचे आहेत. शेतकरी कुटुंबातून आलेल्या शिवदीप लांडे यांचे शिक्षण अकोला जिल्ह्यात झाले. त्यानंतर त्यांनी शेगावमधील श्री संत गजानन महाराज इंजिनिअरिंग महाविद्यालयातून इलेक्ट्रॉनिक्समध्ये बीटेक केले. यानंतर यूपीएससीची तयारी करण्यासाठी त्यांनी मुंबई गाठली. आयपीएस झाल्यानंतर त्यांना बिहार कॅडर मिळाले होते. नक्षल प्रभावित असलेल्या मुंगेर जिल्ह्यातील जमालपूर येथे झाली. यानंतर लांडे यांनी पाटणा, अररिया, पूर्णिया, रोहतास अशा जिल्ह्यांमधे त्यांनी दबंग कामगिरी केली.

# वन्यप्राण्यांसाठी टँकरने पाणी पुरवठा

■ महासागर प्रतिनिधी

अमरावती, दि. १० :



मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत आटल्याने वन्य प्राण्यांना देखील पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यातच कृत्रिम पाणवठेही कोरडे पडल्याने पाण्याअभावी वन्य प्राण्यांची पाण्यासाठी पळापळ सुरू झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

मागील दहा बारा वर्षांपासून मेळघाटातील बारमाही वाहणाऱ्या नदी, नाले आपले अस्तित्व गमावून बसले आहे. नैसर्गिक पाणवठे आटत चालले आहेत.

वनविभागाने जंगलातील अनेक ठिकाणी कृत्रिम पाणवठे तयार केल्याने वन्यप्राण्यांची तृष्णातृप्ती होत आहे. वनविभागाकडून आता कृत्रिम पाणवठ्यांवर टँकर तसेच सोलर पंपांद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू झाला आहे.

नैसर्गिक अधिवासाला पहली पंसती देणारे वन्यप्राणी जलस्रोत आटल्यामुळे अधिवास सोडून स्थलांतरित करण्याची शक्यता असते. सध?या कृत्रिम पाणवठ्यावर आपली तहान भागविण्यासाठी वन्यप्राणी हे जंगलात भटकत असल्याचे चित्र दिसत आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वन्यप्राण्यांची तहान भागविण्यासाठी अनेक नैसर्गिक पाणवठे आहेत. पण यंदा वाढत्या उन्हामुळे हे नैसर्गिक स्रोत आटले आहेत.

मेळघाटातील सिपना, गडगा, मेलडोह, खंडू, खापरा, राजादही, डवाल, कुकरी अशा जंगलातून निघालेल्या नद्यांचा प्रवाह एप्रिल सुरू होण्याच्या आधीच आटला. त्यामुळे वनअधिकारी वन्यप्राण्यांच्या मदतीला धावून आले आहेत. व्याघ्र प्रकल्पातील अधिकारी, कर्मचारी, वनपाल, पाणवठ्यात टँकरने पाणी पुरवठा करताना दिसत आहेत.

हतरू, रायपूर, जारीदा, सेमाडोह, हरिसाल, चौराकुंड, तारूबांदा, हरिसाल, सेमाडोह येथील वनपरिक्षेत्र अधिकारी वन्यप्राण्यांच्या पाण्याची व्यवस्था करीत आहे. त्यामुळे वन्यप्राण्यांच्या समोरील पाणी टंचाईची तीव्रता काही प्रमाणात कमी झाली आहे. मेळघाटात भरपूर पाऊस होत असला तरी सर्व पाणी डोंगरावरून खाली वाहून जात असल्याने या भागात दरवर्षीच पाण्याची मोठी टंचाई निर्माण होत असते.

## पूर्व विदर्भाच्या अनेक भागाला वादळाचा तडाखा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

बुधवारपासून वातावरणात अचानक बदल झाला असून, पूर्व विदर्भाच्या काही जिल्ह्यांना सलग दोन दिवस वादळी वाऱ्यांचा तडाखा बसला. बुधवार आणि गुरूवारीही सायंकाळनंतर सोसाट्याच्या वाऱ्यांनी काही प्रमाणात नुकसान झाले. परिणामी, अनेक भागातील विद्युत पुरवठा अनेक तास खंडित होता.

## दोन प्रवाशांकडून १० लाखांचे दागिने जप्त

■ महासागर प्रतिनिधी

गोंदिया, दि. १० :

गोंदिया-बरौनी एक्स्प्रेस ट्रेनमध्ये चांदीच्या दागिन्यांची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन प्रवाशांना रेल्वे सुरक्षा दलाच्या पथकाने ताब्यात घेतले. त्यांच्या कडून १० किलो ३६८ ग्रॅम चांदीचे दागिने जप्त केले.

पुढील कारवाईसाठी नागपूर आयकर विभागाला कळवले. नरेश कन्हैयालाल वलेछा (६२) रा. सिंधी कॉलनी आणि विष्णू गोपीचंद नागभिरे (५४) रा. श्रीनगर वॉर्ड गोंदिया ही संबंधित प्रवाशांची नावे आहेत.

गोंदिया रेल्वे स्थानकावर बरौनी एक्स्प्रेसची तपासणी केली असता नरेश वलेछा आणि विष्णू नागभिरे या दोन प्रवाशांकडे १० किलो ३६८ ग्रॅम चांदीचे दागिने सापडले.

## १६२५.४६ कोटी रुपयांचे उत्पन्न

**मध्य रेल्वेच्या भुसावळ मंडळाचा नवा विक्रम**

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. १० :

रेल्वेच्या तिजोरीत खणखणाट असून मध्य रेल्वेच्या भुसावळ मंडळाने वर्षभरात १६२५.४६ कोटी रुपयांचे उत्पन्न प्राप्त केले.

आतापर्यंतचे एका वर्षातील हे सर्वाधिक उत्पन्न आहे. मध्य रेल्वेच्या विविध स्थानकांवरून वर्षभरात तब्बल ४३४.१७ लाख प्रवाशांनी प्रवास केला.

भुसावळ मंडळामध्ये तिकीट तपासणी मोहीम राबवून साडेसात लाख प्रकरणांमध्ये ५६ कोटीची रक्कम वसूल केली गेली. जाहिरात महसुलात ७.५८ कोटी, तर पार्सल महसूल २९.९६ कोटी प्राप्त झाला. शेतकरी समृध्दी विशेष रेल्वे चालवून २५ फेऱ्याद्वारे एकूण ४३०२.९ टन मालाची वाहतूक केली. त्यातून १.५५ कोटी रुपये मिळाले. भुसावल मंडळाच्या सर्व स्थानकांवर आरक्षित खिडक्या डिजिटल करण्यात आल्या.

यूटीएस तिकीट विक्रीत ९४.३४ टक्के वाढ झाली. मालभाडे महसुलाचे लक्ष्य ५९४.८१ कोटी निश्चित केले असताना यातून ६४५.७६ कोटींचा महसूल प्राप्त केला. कॅटरिंग सेवेतून १०.९२ कोटीचे उत्पन्न मिळवले. वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवासी महसुलाच्या विक्रमाला पार करत नवा विक्रम केला.

## सप्तश्रृंगी गडावर चेंगराचेंगरीची स्थिती



■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १० :

चैत्रोत्स्वानिमित्ताने सप्तश्रृंगी गडावर भाविकांची प्रचंड गर्दी झाल्यामुळे प्रशासनाचे नियोजन फिस्कटले आहे. परिणामी, गडाच्या पहिल्या पायरीजवळ चेंगराचेंगरी सदृश्य स्थिती निर्माण झाली.

भाविकांनी चैत्रोत्सवानिमित्त सप्तश्रृंगी गडावर गर्दी केली होती. गुरुवारी सकाळी या गर्दीत आणखी भर पडली. यामुळे गडाच्या पहिल्या पायरीजवळ चेंगराचेंगरीसदृश्य स्थिती निर्माण झाली.

: सिनेरंग :

## प्रवीण तरडे म्हणताहेत, 'बोल मराठी!'




शिवछत्रपतींच्या मराठी लेकरांनो, काय सांगतोय ते नीट ऐका असं म्हणत मराठी भाषेची थोरवी असलेला 'बोल मराठी' हा नवा म्युझिक व्हिडिओ लाँच करण्यात आला आहे. लेखक, दिग्दर्शक, अभिनेता प्रवीण तरडे यांनी हे गाणं गायलं असून, या गाण्याचं संगीत अभिजीत कवठाळकर यांनी दिलं आहे.

बोल मराठी या म्युझिक व्हिडिओची निर्मिती लंकेश म्युझिकने केली आहे. प्रवीण तरडे यांच्यासह मृण्मयी फाटक यांनीही गायन केलं आहे. हृषिकेश विदार यांनी गीतलेखन केलेल्या या म्युझिक व्हिडिओचं दिग्दर्शन राजेश कोलन यांचं आहे. योगेश कोळी यांचं छायांकन, अमोल निंबाळकर यांनी संकलन, तक सिद्धार्थ तातूसकर यांनी कला दिग्दर्शन केलं आहे.

मराठी भाषेला अलीकडेच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. या अनुषंगाने मराठी भाषेची महती बोल मराठी या गाण्यात सांगण्यात आली आहे. अत्यंत सोपे शब्द, श्रवणीय संगीत असलेलं हे गाणं आहे.

संगीतकार अभिजीत कवठाळकर यांनी आतापर्यंत अनेक मराठी चित्रपट, म्युझिक व्हिडिओचं संगीत दिग्दर्शन केलं आहे. तर प्रवीण तरडे यांनी प्रथमच म्युझिक व्हिडिओचं गाणं गायलं आहे. युट्यूबवर लंकेश म्युझिक या चॅनेलवर हा म्युझिक व्हिडिओ लाँच करण्यात आला आहे. ■ ■

लोकरंजन

## उन्हाळ्याच्या सुट्टीची नोस्टालजिक सफर घडवणारे 'एप्रिल मे ९९'चे गाणे प्रदर्शित

परीक्षा संपल्या की सुरु होतो सुट्टीचा धमाल काळ! उन्हाळी सुट्टी म्हणजे फक्त मस्ती, खेळ, गंमतीजंमती. याच भन्नाट सुट्ट्यांच्या रंगतदार वातावरणात एप्रिल मे ९९ चित्रपटातील ताकुंबा हे गाणं प्रदर्शित झाले आहे. सुप्रसिद्ध कोरिओग्राफर रेमो डिसूझा यांच्या हस्ते सोशल मीडियावर हे गाणे प्रदर्शित करण्यात आले आहे.

वार्षिक परीक्षा संपल्यावर मुले टेन्शन फ्री असतात आणि मग त्यांचे आवडीचे दिवस सुरु होतात. उन्हाळ्याच्या सुट्टीत उनाडपणा, खेळ, गावभर फिरणे या सगळ्या नॉस्टॅलजीक क्षणांचा अनुभव या गाण्यातून मिळणार आहे. आर्यन मेंगजी (कृष्णा), श्रेयस थोरात (प्रसाद) आणि मंथन काणेकर (सिद्धेश) यांच्यावर चित्रित करण्यात आलेल्या धमाल, मस्ती आणि एनर्जीने भरलेले हे गाणे रोहन-रोहन यांनी संगीतबद्ध केले असून त्यांचाच जबरदस्त आवाज या गाण्याला लाभला आहे. विशेष म्हणजे या गाण्याचे शब्द दिग्दर्शक रोहन मापुस्कर व गीतकार प्रशांत मडूपवार यांनी लिहिले आहेत. सगळ्यांना थिरकायला लावणाऱ्या या गाण्याचे नृत्य दिग्दर्शन स्टॅनली डिकॉस्टा यांनी केले आहे.

या गाण्याची आणखी एक खासियत म्हणजे यानिमित्ताने रोहन, मापुस्कर राजेश मापुस्कर, रेमो डिसूझा, मधुकर कोटीयन आणि स्टॅनली डिकॉस्टा हे एकत्र आले आहेत. करिअरला सुरूवात केल्यापासून यांची घट्ट मैत्री आहे. यानिमित्ताने मैत्रीच्या चित्रपटासाठी मित्र पुन्हा भेटले. मापुस्कर ब्रदर्स इन असोसिएशन विथ फिंगर प्रिंट फिल्म्स, नेक्सस अलायन्स, थिंक टँक आणि मॅगीज पिक्चर्स प्रस्तुत एप्रिल मे ९९ या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन रोहन मापुस्कर यांनी केले असून राजेश मापुस्कर, मधुकर कोटीयन, जोगेश भूटानी, मॉरिस नून हे निर्माते आहेत तर लॉरेन्स डिसोझा सह निर्माते आहेत. ■




## कभी नीम नीम कभी शहद शहद मालिका लवकरच स्टार प्लसवर




स्टार प्लस वाहिनी प्रेक्षकांकरता नेहमीच हृदयस्पर्शी कथा, अविस्मरणीय पात्रे आणि प्रेक्षकांना हृदयाला स्पर्श करणारे नाट्य पेश करत असते. प्रेमकथा असो वा नाट्य असो अथवा बदलत्या कुटुंबांच्या कहाण्या असोत, स्टार प्लस वाहिनी नव्या, नव्या विषयांवर मालिका सादर करण्यात अग्रेसर आहे. हाच वारसा जपत स्टार प्लस वाहिनी प्रेक्षकांकरता 'कभी नीम नीम कभी शहद शहद' ही नवी मालिका सुरू करत आहे. या मालिकेत एक अनोखी प्रेमकथा दाखवण्यात आली आहे, जी प्रेक्षकांच्या मनाला नक्कीच स्पर्श करेल.

'कभी नीम नीम कभी शहद शहद' या आगामी मालिकेचा प्रोमो नुकताच प्रदर्शित झाला आहे. या प्रोमोत प्रेक्षकांना मालिकेतील नाट्याची एक झलक पाहायला मिळेल. या मालिकेत उत्कट आणि दृढ इच्छाशक्ती असलेली- कथा ही महिला दाखविण्यात आली आहे, जिला रोपांचे संगोपन करणे अतिशय प्रिय आहे, आणि ते करताना कथाला एक शांतता लाभते, तिला एक उद्दिष्ट गवसते. निसर्गाशी कथेचे जे नाते आहे, त्यातून तिची आंतरिक शांतता आणि स्वतंत्र भावना प्रतिबिंबित होते.

दुसरीकडे, उदय हा एक उमदा शेफ आहे, ज्याचा सुग्रास खाणे बनविण्यावर विश्वास आहे.एकदा रस्त्यावर या दोघांची परस्परांशी टक्कर होते, आणि त्यात कथा तिच्याकरता मोलाचे असलेले जे रोप ती नेत होती, ते रोप उन्मळून पडते. कथाला राहवत नाही आणि ती उदयला उलटसुलट सुनावते आणि त्याचा अपमान करते. कभी नीम नीम कभी शहद शहद या मालिकेच्या कथेतून परस्परविरोधी व्यक्तिमत्त्वे परस्परांकडे कशी आकर्षित होतात आणि त्यातून त्यांचे भावबंध कसे जुळून येतात, हे दाखवले आहे. हे अनोखे, अपारंपरिक नाते कसे फुलते हे पाहण्याकरता २१ एप्रिलपासून संध्याकाळी ७ वाजता स्टार प्लस वाहिनीवर कभी नीम नीम कभी शहद शहद ही मालिका पाहायला विसरू नका. ■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## आत्महत्याग्रस्त गावांची माती मुख्यमंत्र्यांना देणार शेतकरी

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १० :

शेतकरी कर्जमाफीसाठी शेतकरी संघटना (क्रांतिकारी) आक्रमक पवित्रा घेणार आहे. याअनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांतर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवण्यात आले आहे. कर्जमाफीच्या आठवणीसाठी शेतकरी आत्महत्याग्रस्त गावातील माती मुख्यमंत्र्यांना देणार असल्याचे संघटनेने जाहीर केले आहे.

निसर्गाच्या लहरीपणामुळे सततची नापिकी, बँकेकडून घेतलेले कर्ज यासह इतर कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. गतवर्षीप्रमाणे यंदाही अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले. शेतमालाला योग्य भावही मिळत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे तो आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहे.

दरम्यान, आता कर्जमाफीसाठी शेतकरी संघटनेने (क्रांतिकारी) कर्जमाफीचा मुद्दा लावून धरला आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. निवेदन देताना जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर गवळी, राहुल वानखडे, निलेश गुल्हाने, सैय्यद रियाज, अरविंद तायडे, सदानंद कवळकार, संतोष रुद्रकार, रमेश चिंचे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

फडणवीस यांनी मूर्तिजापूर येथे शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, असे आश्वासन दिले होते. मात्र अद्यापही कर्जमाफीची घोषणा करण्यात आली नाही. गत महिन्यात मूर्तिजापूर तालुक्यातील तीन तरुण शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. कर्जमाफीचे आश्वासन पूर्ण करण्याची आठवण देण्यासाठी मूर्तिजापूर तालुक्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या गावातील माती गोळा करण्यात येईल. मुख्यमंत्र्यांच्या नागपूर येथील निवासस्थानी २८ एप्रिल रोजी दिवसभर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

## गरीब रुग्णांसाठीचा ३५ कोटीचा निधी मंगेशकर रुग्णालयाने वापरलाच नाही

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १० :

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने गरीब रुग्णांसाठी असलेला 35 कोटी 48 लाख रुपयांचा निधी वापरला नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या रुग्णालयाच्या संदर्भात चौकशी आणि तपास करण्यासाठी धर्मदाय सहआयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने सादर केलेला अहवालात ही माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणात चांगलेच अडचणीत आले आहे.

त्यामुळे रुग्णालयाची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या अहवालात ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामध्ये गरीब रुग्णांच्या उपचारासाठी असलेला 35 कोटी 48 लाख रुपयांचा निधी वापरला गेला नसल्याची माहिती आता समोर आली आहे.

प्रत्येक धर्मदाय रुग्णालयाने त्यांच्या उत्पन्नाच्या दोन टक्के निधी हा निराधार आणि अल्प उत्पन्न गटातील लोकांच्या उपचारासाठी राखून ठेवावा, असा नियम आहे.

मात्र, मंगेशकर रुग्णालयाकडे जमा असलेल्या या निधीतील 35 कोटी 48 लाख रुपयांचा निधी वापरला गेला नसल्याची माहिती कागदपत्रांमुळे समोर आली आहे. 2025 मार्च पर्यंत रुग्णालयाने वापरलेल्या निधीची ही रक्कम तशीच असल्याची धक्कादायक माहिती यातून समोर आली आहे.

दीनानाथ रुग्णालयाशी संबंधित तनिषा भिसे गरोदर माता मृत्यू प्रकरणानंतर खडबडून जागे झालेल्या पुणे महापालिकेने शहरातील सर्वच खासगी रुग्णालयांना नोटीस बजावून उपचारापूर्वी डिपॉझिट घेण्यास मनाई केली आहे. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णावर प्रथम उपचार करा त्यानंतर त्यांच्याकडे पैसे मागा, असे या नोटीसीत नमूद करण्यात आले आहे.

महापालिकेने आपल्या नोटीसीत सर्वच खासगी रुग्णालयांना रुग्णांकडून उपचारापूर्वी डिपॉझिट न घेण्यास बंदी घातली आहे. तातडीच्या उपचारांची गरज असलेल्या रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून कोणतीही अनामत रक्कम घेतली जाऊ नये.

सर्वप्रथम रुग्णावर उपचार करण्यास प्राधान्य दिले जावे, असे निर्देश मनपाने आपल्या तातडीच्या नोटीसीद्वारे दिलेत. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे इमर्जन्सी स्थितीत रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# ईव्हिएमविरोधात विविध संघटनांचे जेलभरो आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १० :



भारत मुक्ती मोर्चा आणि राष्ट्रीय पीछडा वर्ग (ओबीसी) मोर्चाच्या वतीने संविधान चौकात जेलभरो आंदोलन करण्यात आले. ईव्हीएम विरोधात घोषणाबाजी करीत महाबोधी महाविहार मुक्त करण्याची मागणी आंदोलकांनी केली.

येथील संविधान चौकात रखरखत्या उन्हात विविध संघटनांचे कार्यकर्ते शेकडोच्या संख्येने एकत्र आले. ईव्हिएम हटाओ संविधान बचाओ, ओबीसीची जातनिहाय जनगणना करा, नवीन शैक्षणिक धोरण रद्द करा, वक्फ बोर्ड संशोधन विधेयक मागे घ्या, महाबोधी महाविहार मुक्त करा अशा विविध मागण्या आंदोलकांनी लावून धरल्या.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये ईव्हीएम मशीनद्वारे घोटाळा करून केंद्रात आणि राज्यात भाजपने सरकार स्थापन केल्याचा आरोप आंदोलकांनी यावेळी केला. या प्रकाराने संसदीय लोकशाही संपण्याच्या मार्गावर आहे. लोकशाही, संविधान वाचवण्यासाठी ईव्हिएम मशीन कायमची हद्दपार करून सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्याची मागणी आंदोलकांनी केली. ईव्हिएम भारतातून हद्दपार हाईपर्यंत हा लढा सुरू ठेवण्याचा इशारा भारतीय बेरोजगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत मुनेश्वर यांनी दिला. या मोर्चाचे नेतृत्व भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुनील गवई. बीएमपी पक्षाच्या उपाध्यक्ष ज्योती शामकुवर यांनी केले.

आंदोलनात शाहेद सिदिकी, विजयराज शेगेकर, विजय चहांदे, भुवन मुनेश्वर, प्रतीक भुजाडे, ॲड. रोशना आडे, अर्चना लढे, वेणूमडावी, अविनाश मरापे, दिनेश आमटे, युवराज आडे, राजीव डफाळे, विलास भोयर, गुलाब कन्नलवार आदींसह बहुजन क्रांती मोर्चा, बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क, छत्रपती क्रांतीसेना, भारतीय बेरोजगार मोर्चा, राष्ट्रीय गुरु रविदास क्रांती मोर्चा, संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, मौर्य क्रांती संघ, बहुजन मुक्ती पार्टी, राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद, महाराष्ट्र टिपू सुलतान सेना, लहुजी क्रांती मोर्चा आदी सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते आणि आंदोलक रस्त्यावर ठिय्या देवून बसले होते.